दैनिक
अन्यायाचा प्रतिकार
# रायगड नगरी
महाराष्ट्राचा बुलंद आवाज..

• वर्ष १६ वे • अंक १५२ • MAHMAR/2006/17212 • रायगड • गुरुवार दि.२६ ऑगस्ट २०२१ • किंमत १ ₹ www.raigadnagari.com

## प्रकल्पग्रस्तांच्या न्याय हक्कासाठी भाजपचे तळोजा मेट्रो कारशेड येथे काम बंद आंदोलन

# ...तोपर्यंत मेट्रोची ट्रायल होऊ देणार नाही : आ.प्रशांत ठाकूर

**दै.रायगड नगरी । पनवेल**

**सिडकोने बेलापूर-पेंधर मार्गावरील नवी मुंबई मेट्रो प्रकल्पात स्थानिक प्रकल्पग्रस्तांना रोजगार दिला जाईल, असे आश्वासन दिले होते, मात्र त्याकडे दुर्लक्ष केल्यामुळे बुधवारी (दि. २५) भाजपच्या वतीने तळोजा येथील मेट्रो कारशेड येथे काम बंद आंदोलन करण्यात येणार असल्याचा इशारा भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांनी सिडकोला दिला होता. त्याप्रमाणे बुधवारी सकाळी आमदार प्रशांत ठाकूर यांच्या नेतृत्वाखाली आंदोलन करण्यात आले. यावेळी आमदार प्रशांत ठाकूर यांनी जोपर्यंत प्रकल्पग्रस्तांना कामावर घेण्याचे लेखी आश्वासन देत नाहीत तोपर्यंत या मेट्रोची ट्रायल आम्ही होऊ देणार नसल्याचे सांगून पोलिसांनी यांना फुकट संरक्षण कशाला द्यायचे असे विचारून आम्ही रोज काम बंद करणार आहोत, पोलिसांना रोज यावे लागेल, असा इशाराही दिला.**



या आंदोलनात भाजपचे तालुका अध्यक्ष अरुणशेठ भगत, प्रदेश सदस्य बाळासाहेब पाटील, उपमहापौर जगदिश गायकवाड, नगरसेवक हरेश केणी, बबन मुकादम, विकास घरत, भाजप तालुका सरचिटणीस राजेंद्र पाटील, ओबीसी नेते एकनाथ देशेकर आदी पदाधिकारी व कार्यकर्त्यांसह स्थानिक प्रकल्पग्रस्त महिला, पुरुष सहभागी झाले होते.

आमदार प्रशांत ठाकूर हे २०१५ पासून याकरिता पाठपुरावा करत आहेत. जेव्हा हा प्रकल्प कार्यान्वित होईल त्यावेळी नक्कीच विचार केला जाईल अशा प्रकारचे ग्वाही सिडकोकडून देण्यात आली होती. आता बहुतांशी कामे पूर्ण झाली असून ऑपरेशन च्या अनुषंगाने तयारी सुरु झाली आहे. दरम्यान या प्रकल्पामध्ये कार्यालयीन कामकाजासाठी ना-गपूर मधून भरती करण्यात आली आहे. याबाबत स्थानिकांना डावलले गेले असल्याने प्रकल्पग्रस्त आक्रमक झाले आहेत. याबाबत स्थानिक नगरसेवक हरेश केणी, भाजपचे स्थानिक नेते प्रल्हाद केणी यांनी सातत्याने पाठपुरावा केला.

**या दरम्यान तळोजा पोलीस ठाण्याचे वरिष्ठ निरीक्षक चव्हाण अनेक वेळा आंदोलक आणि मेट्रोच्या अधिकाऱ्यांमध्ये चर्चा घडवून आणण्याचा प्रयत्न करीत होते, पण मेट्रोच्या अधिकाऱ्यांनी लेखी आश्वासन देण्यास नकार दिला. जोपर्यंत आम्हाला प्रकल्पग्रस्तांना कामावर घेण्याचे लेखी आश्वासन देत नाही तोपर्यंत आम्ही गेटवरून हलणार नाही, अशी भूमिका घेऊन तीन तास उन्हात बसलेल्या आंदोलकांना मेट्रो अधिकाऱ्यांकडून कोणताही प्रतिसाद न मिळाल्याने अखेर आंदोलकांनी गेटमधून आत जाण्याचा प्रयत्न केल्यावर आमदार प्रशांत ठाकूर व आंदोलकांना पोलिसांनी ताब्यात घेतले. नंतर सर्वांना सोडून देण्यात आले. आमच्यावर गुन्हे दाखल करताना पोलीस कोविड प्रोटोकॉल मोडल्याचाही गुन्हा दाखल करतील. मग ज्या सिडको आणि मेट्रो अधिकाऱ्यांमुळे आम्हाला आंदोलन करावे लागले त्यांच्यावरही पोलीस कोविड प्रोटोकॉल मोडल्याचे गुन्हे दाखल करणार काय, असा सवाल यावेळी आमदार प्रशांत ठाकूर यांनी केला.**

यावेळी बोलताना आमदार प्रशांत ठाकूर यांनी, तुमचे गेट बंद असले तरी स्थानिक प्रकल्पग्रस्तांना इतर मार्गही माहीत असल्याचा सूचक इशारा त्यांनी दिला.

आमच्या महिला- भगिनी घरात करमणूक नाही म्हणून येथे उन्हातान्हात बसलेल्या नाहीत. आमच्या नगरसेवकांना दुसरे काम नसल्याने येथे आलेले ना-हीत. स्थानिक प्रकल्पग्रस्तांचे प्रश्न सिडको गांभीर्याने घेत नसल्याने आम्हाला हे आंदोलन करावे लागत आहे. तहान लागल्यावर विहीर खोदणारे सिडको व मेट्रोचे अधिकारी आहेत. त्यांना १५ दिवस आधी नोटीस दिल्यावर आता चर्चेला बोलवत आहेत. आम्हाला न्याय मिळाल्याशिवाय आम्ही येथून जाणार नाही. पोलिसांच्या बंदोबस्ताच्या आड लपणाऱ्या अधिकाऱ्यांमुळे आम्हाला आंदोलन करावे लागत असल्याचे त्यांनी सांगितले.

## साखर सुतारवाडी व केवनाळे व तळीये भागाची जिल्हाधिकारी डॉ.महेंद्र कल्याणकर यांनी केली पाहणी



**दै.रायगड नगरी । पोलादपूर**

पोलादपूर तालुक्यातील साखर सुतारवाडी व केवनाळे तसेच महाड मधील तळीये या दरडग्रस्त भागाची जिल्हाधिकारी डॉ. महेंद्र कल्याणकर यांनी आज पाहणी केली. याशिवाय त्यांनी महाड शहराचीही पाहणी केली. या पाहणी दरम्यान त्यांनी प्रशासनाने आतापर्यंत केलेल्या व यापुढे करावयाच्या उपाययोजनांची माहिती घेतली.

तसेच त्यांनी नागरिकांच्या अडीअडचणी समजून घेतल्या व येथील नागरिकांना शासकीय सोयी-सुविधा देण्याबाबत आश्वस्त केले.

यावेळी जिल्हा परिषद सदस्य चंद्रकांत कळंबे, मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. किरण पाटील, प्रांताधिकारी श्रीमती प्रतिमा पुदलवाड, महाड तहसिलदार सुरेश काशिद, पोलादपूर प्र.तहसिलदार समीर देसाई, गटविकास अधिकारी श्रीमती वृषाली यादव,तालुका आरोग्य अधिकारी गुलाबराव सोनवणे तसेच ग्रामस्थ उपस्थित होते.

# नारायण राणेंना हायकोर्टाचा दिलासा

### कोणीतीही कारवाई न करण्याचे आदेश

**दै.रायगड नगरी । मुंबई**

कालचा दिवस हा महाराष्ट्राच्या राजकारणासाठी महत्वाचा दिवस. सोमवारी केंद्रीय मंत्री नारायण राणे यांनी राज्याच्या मुख्यमंत्र्यांविरोधात एक आक्षेपार्ह वक्तव्य केलं आणि मंगळवारी त्यावरुन राजकीय वाद रस्त्यावर पाहायला मिळाला. आज नारायण राणे यांनी हायकोर्टात याचिका दाखल केली आहे. या याचिकेवर दुपारी सुनावणी पार पडली आहे. सुनावणीदरम्यान १७ सप्टेंबरपर्यंत राणेंवर कोणतीही कठोर कारवाई न करण्याची आदेश हायकोर्टाने दिले असून राज्य सरकारने देखील त्याबाबत हमी दिली आहे.



नारायण राणेंविरुद्ध राज्यात विविध ठिकाणी दाखल केलेल्या गुन्हे हे खोटे आहेत, असे राणेंचे वकील सतीश मानेशिंदे यांनी सांगितले आहे. या गुन्ह्यांविरोधात ही याचिका हायकोर्टात करण्यात आली आहे. राणेंवर जिथे गुन्हे दाखल आहेत तिथे जाण्याची गरज नाही. नारायण राणे यांनी २३ ऑगस्टला केलेलं वक्तव्य प्रक्षोभक नव्हतं, असे देखील वकील मानेशिंदे पुढे म्हणाले.

विशेष सरकारी वकील अमित देसाई यांनी देखील राज्य सरकारच्या वतीने बाजू मांडली. जोवर पुढची सुनावणी होत नाही तोवर कुठलंही विधान करू नये अशी मागणी देसाई यांनी केली. मात्र, राणेंचे वकील मानेशिंदे यांनी ही मागणी म्हणजे व्यक्तिस्वातंत्र्यावर गदा आणण्यासारखे आहे, असे कोर्टात सांगितले. त्यानंतर हायकोर्टाने राज्य सरकारची ही मागणी मान्य केली नाही. पुढील सुनावणी १७ सप्टेंबरला घेण्यात येईल.

पोलिसांच्या कारवाईला स्थगिती देण्याची राणेंच्या याचिकेत प्रमुख मागणी करण्यात आली आहे. दाखल गुन्हे चुकीच्या कलमांखाली दाखल झाल्यानं ते रद्द करण्याचीही याचिकेत मागणी करण्यात आली आहे.

## संक्षिप्त...

### राज्यात आज रुग्ण संख्येत वाढ; मृत्यू संख्येनेही वाढली चिंता

**दै.रायगड नगरी । अलिबाग**

राज्यात कालच्या तुलनेत आज करोना बाधितांच्या मृत्यूंच्या संख्येत वाढ झाली असून दैनंदिन रुग्णसंख्याही आज वाढली आहे. राज्याच्या आरोग्य विभागाने दिलेल्या माहितीनुसार, आज दिवसभरात राज्यात २१६ रुग्णांचा मृत्यू झाला आहे. काल ही संख्या ११९ इतकी होती. तसेच, आज बरे होणाऱ्या रुग्णाची संख्या ४ हजार ३८० इतकी आहे. कालच्या तुलनेत बरे होणाऱ्या रुग्णांची संख्या मात्र किंचित वाढली आहे हा त्यातल्यात्यात एक दिलासा मिळाला आहे. तर आज राज्यात एकूण ५ हजार ०३१ इतक्या नव्या रुग्णांचे निदान झाले आहे. काल ही संख्या ४ हजार ३५५ इतकी होती.

आज राज्यात झालेल्या २१६ रुग्णांच्या मृत्यूंनतर राज्याच्या मृत्यूदरात किंचित वाढ होत तो २.१२ टक्क्यांवर गेला आहे. याबरोबर राज्यात आतापर्यंत एकूण ६२ लाख ४७ हजार ४१४ रुग्ण बरे झाले आहेत. यामुळे राज्यातील रुग्ण बरे होण्याचे प्रमाण ९७.०४ टक्के इतके झाले आहे. राज्यातील एकूण सक्रिय रुग्णांची संख्या ५० हजार १८३ वर आली आहे. राज्यातील सक्रिय रुग्णांचा जिल्हानिहाय विचार करता पुणे जिल्ह्यात सक्रिय रुग्णांची संख्या सर्वाधिक आहे. पुणे जिल्ह्यात हा आकडा १२ हजार ६७३ वर गेला आहे. ठाणे जिल्ह्यात ७ हजार ०४१ सक्रिय रुग्ण आहेत. त्या खालोखाल सातार्‍यात ही संख्या ५ हजार ४०० इतकी आहे. तर, सांगलीत एकूण ४ हजार ६६८ इतके रुग्ण उपचार घेत आहेत.

### ओवळे गावातील शेकाप कार्यकर्त्यांचा भाजपमध्ये प्रवेश

## मतांचा संघर्ष नाही तर भूमिपुत्रांच्या अस्मितेसाठी संघर्ष : आशिष शेलार

**दै.रायगड नगरी । पनवेल**

राजकारणाचा आधार घेऊन गांधी परिवाराचे नाव प्रकल्पांना देतात. मात्र ज्यांनी गरिबांसाठी संघर्ष केला, भूमिपुत्रांना न्याय मिळवून दिला अशा थोर संघर्षमूर्ती दि. बा. पाटील यांचे नाव नवी मुंबई विमानतळाला देण्यास महाराष्ट्र सरकार का विरोध करत आहे हे ठाकरे सरकारने जाहीर करावे, असे आव्हान राज्याचे माजी शिक्षण मंत्री आशिष शेलार यांनी महाविकास आघाडी सरकारला आज(दि. २५) येथे दिले.

मी शेकापक्षातून आलो म्हणून शेकापवाले मी गद्दारी केली असे बोंबलत बसतील. प्रवेश करू नका म्हणून मला अनेक विनवण्या आल्या पण मी रोखठोक सांगितले आता माघार नाही मी शब्द दिला आहे आणि तो पूर्ण करून भाजप वाढविण्यासाठी प्रयत्न करणार. आमच्या गावावर संकट वेळ आली तेव्हा लोकनेते रामशेठ ठाकूर एका फोनवर धावून आले आमच्यासाठी रस्त्यावर ठिय्या मांडून बसले. त्यामुळे त्यांच्या नेतृत्वाने आम्हाला दिशा दिली आहे.

**- गजानन म्हात्रे**



ओवळे विभागातील शेतकरी कामगार पक्षाचे युवा नेते तसेच २७ गाव समिती कार्याध्यक्ष सुनिलशेठ म्हात्रे तसेच ज्येष्ठ कार्यकर्ते गजानन म्हात्रे, तुकाराम म्हात्रे, संतोष म्हात्रे यांच्यासह महिला मंडळ, ज्येष्ठ, महिला, युवक शेकडो कार्यकर्त्यांनी भारतीय जनता पार्टीत जाहीर प्रवेश केला. मार्केट यार्ड मधील श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाच्या सभागृहात हा पक्षप्रवेश सोहळा राज्याचे माजी शिक्षण मंत्री आशिष शेलार यांच्या हस्ते आणि .../४

## घरातील बेडरूम मधून ३ लाखांची रोकड लंपास

**दै.रायगड नगरी । पनवेल**

एका बंद घराच्या दरावाज्याचे अज्ञात चोरट्याने लॉक तोडून त्यावाटे आत प्रवेश करून घरातील बेडरूममधील लोखंडी कपाटाचा दरवाजा तोडून त्यात ठेवलेले ३ लाखांची रोकड चोरल्याची घटना पनवेल शहरात घडली आहे. शहरातील वरद विनायक सोसायटी येथे राहणारे अरविंद ठक्कर यांचे घर बंद असल्याचे पाहून घराच्या दरावाज्याचे अज्ञात चोरट्याने लॉक तोडून त्यावाटे आत प्रवेश करून घरातील बेडरूममधील लोखंडी कपाटाचा दरवाजा तोडून त्यात ठेवलेले ३ लाखांची रोकड चोरल्याची घटना घडल्याने याबाबतची तक्रार पनवेल शहर पोलिस ठाण्यात करण्यात आली आहे.



## मनसेचे गजाजन काळे यांना अटकेपासून हायकोर्टाचा दिलासा

**दै.रायगड नगरी । नवीमुंबई**

महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे (मनसे) नवी मुंबई शहराध्यक्ष गजानन काळे यांना मुंबई उच्च न्यायालयाकडून दिलासा मिळाला आहे. ७ सप्टेंबरपर्यंत त्यांच्यावर कोणतीही कठोर कारवाई न करण्याचे कोर्टाने आदेश दिले आहेत. दरम्यान गजानन काळे यांच्या पत्नीने विवाहबाह्य संबंध, कौटुंबिक हिंसाचार आणि जातीवाचक शिवीगाळ केल्याचा आरोप तक्रारीत केला आहे. सध्या नेरूळ पोलीस ठाण्यात त्यांच्या विरोधात कौटुंबिक हिंसाचार आणि अट्रॉसिटीची तक्रार नोंदवण्यात आली आहे.



पत्नीने पोलिसात धाव घेतल्यापासून गजानन काळे फरार आहेत. काळे यांच्या पत्नीने या प्रकरणात मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांच्या पत्नी शर्मिला ठाकरे यांची भेट घेऊन सर्व घडलेला प्रकार त्यांना सांगितला आहे. गेल्या काही वर्षांपासून गजानन काळे मारहाण करत होते अशी तक्रार त्यांच्या पत्नीने केली आहे. तसेच त्यांचे अनेक स्त्रियांशी विवाहबाह्य संबंध असल्याचा खळबळजनक आरोप करण्यात आला आहे. गजानन काळे आणि संजीवनी काळे हे २००८ साली विवाहबद्ध झाले. .../४

## चिरनेर जंगल सत्याग्रहाचा अक्कादेवी रस्ता दुरुस्तीच्या प्रतिक्षेत

**दै.रायगड नगरी । उरण**

उरण तालुक्यातील दुर्गम आक्कादेवी आदिवासी भागातील व १९३० झाली झालेल्या गौरवशाली व शौर्यशाली चिरनेर जंगल सत्याग्रहाच्या ठिकाणी जाणाऱ्या अंतर्गत रस्त्याची अनेक वर्षापासून दुरावस्था झाली आहे. वाड्या पाड्यात जोडणाऱ्या या रस्त्याकडे प्रशासन व लोकप्रतिनिधींकडून दुर्लक्ष झाल्याने या भागातील आदिवासींना कमर तोड खड्ड्यातून प्रवास करावा लागत आहे. परिणामी नादुरुस्त रस्तामुळे येथील आदिवासींचे हाल होत आहेत.



येथील शेतकऱ्यांना जमिनीचा मोबदला न मिळाल्यामुळे या रस्त्याचे काम थांबले आहे. हा ऐरणीवर असलेला प्रश्न केव्हा व कसा सुटेल हा एक मोठा प्रश्नच आहे. दळणवळणाची व्यवस्था नसल्यामुळे त्यांच्या उपजीविकेवर विपरित परिणाम होत आहे. .../४

# दमदार पावसामुळे गुरांसाठी तयार झाला मुबलक हिरवा चारा



**दै.रायगड नगरी । खांब-रोहा**

या वर्षी कोसळलेल्या दमदार पावसामुळे गुरांसाठी आवश्यक असणारा हिरवा चाराही मुबलक स्वरूपात निर्माण झाल्याने शेतकरी वर्ग व गुराखी समाधानी दिसत आहेत.

चालू हंगामात मोसमी पावसाने योग्य कालावधीत सुरुवात केल्याने लवकरच जमिनीवरील गवत उगवून वर आल्याने सर्वत्र हिरवेगार रान तयार झाले. त्यामुळे गुरांसाठी आवश्यक चारा तयार झाल्याने शेतकरी वर्ग चांगला सुखा-वला आहे. पावसाळ्यात सर्वत्र हिरवाई पसरते त्यामुळे हिरव्या चा-यासह विशिष्ट झाडांची हिरवीगार पानेही गुरेढोरे मोठ्या चवीने खातात.ऊन्हाळ्यातील सुकलेले गवत खाऊन गुरे सुस्तावलेली असतात याशिवाय म्हणावे तसे पोषक घटकही त्यांना मिळत नसल्याने दुभती जनावरेही कमी दूध देतात.त्याचा परिणाम दुग्ध व्यवसायावरही होत असल्याने सा-यांच्या नजरा या हिरव्या चा-याकडे लागलेल्या असतात व कधी एकदा पाऊस पडतोय असे वाटत असते.

पावसाळा ऋतू सुरू झाल्यावर गुरांच्या हिरव्या चा-याचा प्रश्न जवळपास सहा महिने तरी सुटला जातो. सध्या पावसाळ्यामुळे सगळीकडे हिरवेगार व आल्हाददायक वातावरण निर्माण झाले असल्याने गुरांनाही चरण्यासाठी पोषक वातावरण असल्याने गुरे ही जास्त काळ या वातावरणात रमतात.चरण्यासाठी हिरवागार चारा मिळत असल्याने त्यांचेही पोट चांगले भरते याशिवाय गुरे चांगली धष्टपुष्ट होतात,दुभती जनावरेही चांगले दूध देतात.इतर वेळेपेक्षा पावसाळ्यात दुभती जनावरे चांगले दूध देत असल्याने शेतक-यांनाही चांगला आर्थिक लाभ होतो.याशिवाय गुरांसाठी बाजारातून वेगळा चारा खरेदी करावा लागत नसल्याने शेतकरी वर्गाची थोडी फार आर्थिक बचतही होते.

साधारणपणे नोव्हेंबर डिसेंबर पर्यंत अशाप्रकारची हिरवळ परिसरात कायम राहत असल्याने एवढा वेळ तरी शेतकरी वर्गाला गुरांच्या चा-यासाठी कुठेही भटकावे लागत नाही.

# याकुब बेग हायस्कूल व जुनियर कॉलेज, पनवेल येथे अटल टिंकरिंग लॅबोरेटरीचे उद्घाटन

**दै.रायगड नगरी । पनवेल**

केंद्र सरकारच्या नीती आयोगातर्फे सुरू करण्यात आलेल्या अटल टिंकरिंग लॅबोरेटरीच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना शालेय जीवनापासूनच नवनिर्मिती करण्याची संधी मिळावी, संशोधनाची आवड विद्यार्थ्यांमध्ये निर्माण व्हावी व सर्जनशीलतेला चालना मिळावी या उद्देशाने केंद्र सरकारच्या नीती आयोगातर्फे अटल इनोव्हेशन मिशन अंतर्गत याकुब बेग शाळेची निवड करण्यात आली होती. यामध्ये विद्यार्थ्यांना विज्ञान, अभियांत्रिकी व गणित या विषयातील नव्या संकल्पना रूजविणे व त्यांच्यातील कौशल्य विकसित होण्यास मदत होणार आहे असे प्रतिपादन पनवेल एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष इक्बाल हुसैन काझी यांनी केले.

याप्रसंगी पनवेल एज्युकेशन सोसायटीचे उपाध्यक्ष व पनवेल महानगरपालिकेचे नगरसेवक मुकीत अब्दुल लतीफ काझी, सचिव मोहम्मद नुर हसनमिया पटेल, सचिव अलीम अमिरूद्दिन पटेल, खजिनदार माझ शाहनवाझ मुल्ला, याकुब बेग हायस्कूल व जुनियर कॉलेजचे चेअरमन असिफ हसन करेल संस्थेचे सदस्य असिफ युसुफ शकूर, पनवेल नगरपरिषदेचे माजी नगराध्यक्ष सइद मुल्ला इतर प्रतिष्ठित नागरिक व मान्यवर तसेच याकुब बेग हायस्कूल व जुनियर कॉलेजचे प्राचार्य आसीम शरफुद्दीन पटेल शिक्षक उपस्थित होते.

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीशीद्वारे कळविण्यात येते की, ज्याअर्थी मौजे घोट, ता. पनवेल, जि. रायगड येथिल पुढीलप्रमाणे वर्णनाची मिळकत सदर मिळकतीचे मालक १. श्री. नामदेव गोपाळ पाटील, २. श्री. लहु गोपाळ पाटील, ३. श्री. प्रमोद गोपाळ पाटील, ४. श्रीमती चंद्रभागा जोमा फडके आणि ५. श्रीमती कल्पना संजय पाटील सर्व रा. घोट, ता. पनवेल, जि. रायगड यांचेकडून आमचे अशिल श्री. बाबुराव कृष्णा भोईर यांनी कायम खरेदीने घेण्याचे ठरविले आहे.

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे - घोट, ता.- पनवेल, जि.- रायगड.**

| अ.क्र. | भूमापन क्रमांक | हिस्सा नं. | क्षेत्रा हे.आर.पॉ. | पोट खराबा | एकूण | आकार रु. पै. |
|---|---|---|---|---|---|---|
| १. | २० | १अ | ०-६८.३० | ०-०२.८० | ०-७१.१० | ११.३२ |
| २. | २० | १ब | ०-३३.४० | ०-०१.५० | ०-३४.९० | ६.१२ |
| ३. | २६ | ८ | ०-०९.०० | - | ०-०९.०० | ०.३७ |

त्याअर्थी सदर मिळकतीमध्ये अगर तिचे कोणत्याही भागावर कुणाही ति-हाईतांचे गहाण-दान, बक्षिस, फरोक्त, करारनामा, एम.ओ.यू, हुकुमनामा, मनाई आदेश, जप्ती, वहिवाट, हिस्सा अगर तत्सम कोणतेहि हक्क - हितसंबंध निगडीत असल्यास अगर सदर व्यवहारास कुणाचीही कोणत्याही प्रकारे हरकत असल्यास अशा हितसंबंधीत व्यक्ती, संस्था इत्यादींनी त्यांची लेखी हरकत जरुर त्या कागदोपत्री पुराव्यानिशी सदर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून एकविस दिवसांचे आत आमच्या खालीलप्रमाणेच्या पत्त्यावरील कार्यालयात सादर कराव्यात.

विहित मुदतीमध्ये कुणाचीही हरकत न आल्यास सदर भूखंडावरील १. श्री. नामदेव गोपाळ पाटील, २. श्री. लहु गोपाळ पाटील, ३. श्री. प्रमोद गोपाळ पाटील, ४. श्रीमती चंद्रभागा जोमा फडके आणि ५. श्रीमती कल्पना संजय पाटील यांचे मालकी हक्क - हितसंबंध निर्वेध व बोजारहित आहेत असे समजुन आमचे अशिल सदरचा व्यवहार पूर्ण करतील व मुदतीनंतर आलेल्या हरकती ग्राहय धरल्या जाणार नाहीत. हे सर्व जाहीर व्हावे.

पनवेल
दि.२५/०८/२०२१

**सही/-**
**ॲड.धनश्री मारुती पाटील**
**ऑफिस : ०३, तळ मजला, परीगंधा बिल्डिंग, बल्लाळेश्वर मंदिर, धूतपापेश्वर कॉर्नर, जोतीबा फुले रोड, पनवेल, जि. रायगड**

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीशीने कळविण्यात येत आहे की, आमचे अशिल हे खालील परिशिष्टात वर्णन केलेली जमीन मिळकत ही सदर मिळकतीचे मुळ मालक श्री.दत्तात्रेय आंबो म्हात्रे यांच्याकडून विकसन कराराने विकसनाकरिता घेण्याचे ठरविले आहे. सदर जमीन मिळकतीचे वर्णन पुढीलप्रमाणे :-

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे : कोळखे, ता.पनवेल, जि.रायगड**

| स.नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रु.पैसे | मालकांचे नाव |
|---|---|---|---|---|
| १८० | ० | ०-२९-०० पैकी ०-१-५३ म्हणजेच १५३० चौ.फूट जमीन मिळकत आणि ०-०३-५० म्हणजेच ३५०० चौ.फूट जमीन मिळकत | ०.७५ | श्री.दत्तात्रेय आंबो म्हात्रे |

वरील वर्णन केलेली जमीन मिळकत अथवा तिच्या कोणत्याही भागावर यापूर्वी विक्री, देणगी, मक्ता, वहिवाट, ताबा, देखभाल, गहाण, कुळ इत्यादी कोणताही हक्क असलेल्या सर्व संबंधितांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांच्या आत आपल्या लेखी हरकती कागदोपत्रांसहीत व पुराव्यासहीत खाली सही करणारे यांचेकडे त्यांच्या खाली दिलेल्या पत्त्यावर पोहोचवावी अथवा रजिस्टर्ड पोस्टाने दाखल कराव्या. वरील मुदतीत कोणाकडून काही लेखी हरकत, तक्रार, दावा न आल्यास सदर मिळकत निर्वेध, बोजारहीत असून त्यावर कोणत्याही प्रकारचा दावा, हक्क, हितसंबंध नाही असे समजून आम्ही सदर मिळकतीचा व्यवहार पूर्ण करू व त्यानंतर आलेल्या कोणत्याही प्रकारच्या हरकती, तक्रारी, दावे आमचेवर बंधनकारक राहणार नाहीत व त्या सोडून दिल्या आहेत असे गृहीत धरले जाईल याची तत्सम लोकांनी कृपया नोंद घ्यावी.

पनवेल
दि.२५/०८/२०२१

**सही/-**
**ॲड.भुषण मोरेश्वर म्हात्रे**
**१४६, पहिला मजला, नगरपालिका कॉम्प्लेक्स, भाजी मार्केटजवळ, पनवेल, ता.पनवेल, जि.रायगड-४१०२०६**
**मो.नं.९८९२२२२२५७**

# जिल्हा परिषदेच्या सेस फंडातून शेतकऱ्यांनी विविध योजनांचा लाभ घ्यावा : आशिका ठाकूर

**दै.रायगड नगरी । कोर्लई**

रायगड जिल्हा परिषदेच्या सेस फंडातून विविध शेतीपयोगी साहित्य कॅश लेस पद्धतीने खरेदी करावे व अनुदानासाठी पंचायत समितीच्या कृषी विभागाकडे प्रस्ताव सादर करावा.असे आवाहन मुरुड तालुका पंचायत समितीच्या सभापती आशिका ठाकूर व गटविकास अधिकारी अनिकेत पाटील यांनी केले आहे.

सदर योजनेअंतर्गत ७५% टक्के अनुदानाने ताडपत्री, शेतीपयोगी अवजारे, पीक संरक्षण अवजारे व औषधे त्याच प्रमाणे तालुक्यातील अनुसूचित जमाती व जाती तील शेतकऱ्यांकरीता बिरसा मुंडा कृषी क्रांती योजना व डॉ.बाबासाहेब आंबेडकर कृषी स्वावलंबन योजना अंतर्गत शेतकऱ्यांना सिंचन विहीर,पाईप लाईन, परसबाग याकरीता शंभर टक्के अनुदान देण्यात येते.

तरी तालुक्यातील अनुसूचित जाती व जमातीच्या शेतकऱ्यांनी पंचायत समितीचे कृषी अधिकारी अरुण धिवरे यांच्या कडे संपर्क साधावा. असे आवाहन सभापती आशिका ठाकूर व गटविकास अधिकारी अनिकेत पाटील यांनी केले आहे.

ॲड.सचिन केणी

## जाहीर नोटीस

उरण येथील मे.दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर यांचे कोर्टात
दि.चौ.अर्ज क्र.७६/२०२१
नि.नं.८/ड
ने.ता.०६/१०/२०२१

श्रीमती.काशीबाई आत्माराम कडू
व इतर ६ — अर्जदार
विरुद्ध
कोणीही नाही — सामनेवाला

तमाम जनतेस या जाहीर नोटीशीद्वारे कळविण्यात येते की, कै. आत्माराम जम्मु कडू हे दि.२९/०६/२०२० रोजी मौजे : सोनारी, ता.उरण, जि.रायगड येथे मृत्यू पावले असून त्यांचे खालील वर्णनाची मिळकतीबाबत वारस दाखला मिळणे करिता अर्जदार यांनी सदरचा अर्ज केलेला आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| अ. क्र. | गाव | सर्व्हे क्र. | हिस्सा क्र. | क्षेत्रफळ हे.आर.पॉ. | युनिट केस नं. |
|---|---|---|---|---|---|
| १ | सोनारी | १६ | १ | ०-१२-६ | सोनारी |
| | | २३ | ४ | ०-१२-९ | ७६/६० |
| २ | करळ | ९ | १/१ | ०-१४-४ | करळ ३०८/४८ |
| ३ | करळ | १५१ | ६ | ०-०२-१२ | करळ ११७ |
| ४ | करळ | ११९ | ११ | ०-१५-३ | करळ |
| | | १३३ | १ ब | ०-०२-८ | ९१/८७ |
| | | १४४ | ४६ | ०-०१-३ | |
| ५ | करळ | १०८ | १२ | ०-१३-० | करळ |
| | | १०९ | ७/१ | ०-१०-८ | २०८+२०९ |
| | | १२७ | ३ | ०-०१-४ | |
| | | १९२ | ४ | ०-१३-१ | |
| | | १६९ | २४ | ०-०४-० | |
| | | १६० | ४ | ०-०८-८ | |
| | | १६४ | १५ | ०-०७-८ | |

वरील मिळकती बाबत अर्जदार हे कै.आत्माराम जम्मू कडू यांचे कायदेशीर वारस आहेत. त्यांच्या हक्काबाबत कोणीही व्यक्तीस हरकत घ्यावयाची असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत ह्या मे.कोर्टात प्रत्यक्ष हजर राहून अगर त्यांच्या वकीलामार्फत त्यांच्या हरकती सादर कराव्यात. विहित मुदतीमध्ये हरकत सादर न केल्यास ना.कोर्ट योग्य त्या पुराव्यानिशी वरील अर्जदार यांस वारस दाखला प्रदान करतील. मुदतीनंतर येणाऱ्या हरकती ग्राह्य धरल्या जाणार नाहीत.

येणेप्रमाणे जाहीर नोटीस आज दि.माहे ३० मार्च सन २०२१ रोजी माझ्या सहीने व या मे.कोर्टाचे शिक्क्यानिशी दिली.

**सही/-** **क.लिपीक** **दि.न्या.व.स्तर, उरण** — कोटाचा शिक्का — **सही/-** **सहा.अधिक्षक** **दि.न्या.व.स्तर, उरण**

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या नोटीसीद्वारे जाहीर सूचना देण्यात येते की, १) श्री.कमलाकर तुकाराम मुंडकर २) श्री.मच्छिंद्र तुकाराम मुंडकर ३) श्री.तुकाराम कान्हा मुंडकर ४) श्री.योगेश पांडुरंग केणी ५) श्री.निलेश पांडुरंग केणी रा.चिंचपाडा, तालुका : पनवेल, जिल्हा : रायगड प्रमाणे खालील वर्णन केलेल्या भूखंडाचे वाटप झालेले आहे. सदर भूखंड हे वर उल्लेख केलेले शेतकरी यांच्या संपादीत जमिनीच्या मोबदल्यात साडेबावीस टक्के योजनेंतर्गत सिडको लिमिटेड नवी मुंबई कडून खालीलप्रमाणे पात्रता मंजूर होवून करारनामा झाला आहे. वर नमूद शेतकऱ्यांकडून खालील वर्णन केलेला भूखंड माझे अशिल मे.लक्षदीप डेव्हलपर्स, पत्ता : तळमजला, शॉप नं.४, यशराज कॉम्प्लेक्स, प्लॉट नं.१/१ ए, सेक्टर १६, कामोठे, पनवेल यांनी क्षेत्र ५७० चौ.मी. पैकी २० टक्के अविभाज्य भाग त्रिपक्षीय करारनामा/ हस्तांतरण करण्याचे व विकत घेण्याचे ठरविले आहे.

**मालमत्तेचा तपशिल**
**सिडको फाईल क्रमांक** CHIM-OG-57

| नोड | सेक्टर | प्लॉट क्र. | क्षेत्र |
|---|---|---|---|
| पुष्पक (वडघर) | आर २ | १२६ | ५७० चौ.मी. पैकी २० टक्के अविभाज्य भाग |

वर वर्णन केलेल्या मिळकतीमध्ये कोणाचाही कोणताही मालकी हक्क, हितसंबंध, गहाण, दान, बक्षिसपत्र, लिन, लिज, पोटगी, दावा, खरेदीखत इ. कोणत्याही प्रकारचे हितसंबंध हक्क असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून १५ दिवसाच्या आत खाालील पत्त्यावर कागदपत्रासहीत लेखी हरकत दाखल करावी. त्यानंतर येणाऱ्या हरकतींचा विचार केला जाणार नाही. मुदतीत हरकत न घेतल्यास ज्यांचे हक्क आहेत ते स्वखुशीने सोडून दिले आहेत असे समजले जाईल. मुदतीत हरकती आल्या नाहीत तर सदरची मिळकत निर्वेध आहे असे समजण्यात येईल. सदर सूचना प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसांच्या आत जर आवश्यक त्या पुराव्यासहीत हरकत नोंदविली नसेल तर त्याची नोंद घेतली जाणार नाही, याची कृपया नोंद घ्यावी.

**सही/-**
**ॲड.सुजाता जो.पाटील**
**विसावा को.ऑप.हौ.सोसायटी, प्लॉट नं.ई १२४/१३, सेक्टर १२, खारघर, नवी मुंबई-४१०२१०**
**मो.नं.८८७९४१६४८३**

मा.इंदलकर साो.

ॲड.रुपेश राम म्हात्रे

## जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी साहेब यांचे न्यायालयात
क्रि.एम.ए.२००/२०२१
नि.नं.२०/ड
ने.ता.२७/०९/२०२१

श्री.भालचंद्र गणपत भोईर
वय : ५६ वर्षे, व्यवसाय : नोकरी
रा.मु.चिंचपाडा, पो.वडघर,
ता.पनवेल, जि.रायगड-४१०२०६ — अर्जदार
विरुद्ध
ग्रामविकास अधिकारी / ग्रामसेवक
ग्रामपंचायत वडघर
पत्ता : मु.पो.वडघर, ता.पनवेल,
जि.रायगड-४१०२०६ — सामनेवाला

ज्याअर्थी कै.काळुबाई गणपत भोईर यांचा मृत्यू दि.३१/०५/२००७ रोजी किंवा त्या सुमारास मौजे : चिंचपाडा, पो.वडघर, ता.पनवेल, जि.रायगड येथे झाला आहे, म्हणून अर्जदार यांनी या न्यायालयात सदर कै.काळुबाई गणपत भोईर यांचे मृत्यूच्या तारखेची नोंद होणेकामी पनवेल येथील मे.प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी यांच्या न्यायालयात अर्ज केलेला आहे.

सदर कै.काळुबाई गणपत भोईर ही वर नमूद ठिकाणी मयत झाली आहे किंवा कसे हे कोणास समजविण्याचे असेल तर या जाहीर नोटीसीचे तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या न्यायालयात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात. आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती दाखविल्या नाही, तर सदर न्यायालय अर्जदार यांच्याकडे लागलीच पुरावा घेवून त्यास सदरहू व्यक्तीचे मृत्यूची नोंद करण्याचे आदेश संबंधितांना देईल.

येणेप्रमाणे ही जाहीर नोटीस आमच्या सहीनिशी व कोर्टाच्या शिक्क्यानिशी आज रोजी दि.२५/०८/२०२१ रोजी दिली.

**सही/-** **क.लिपीक** **फौ.न्याया, पनवेल** — कोटाचा शिक्का — **सही/-** **सहा.अधिक्षक** **फौ.न्याया, पनवेल**

मा.गोडसे साहेब कोर्ट

अर्जदारांचे वकील ॲड.एकनाथ जी. खुटले

## जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.३ रे सह दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर यांचे कोर्टात
दि.चौ.अर्ज क्र.१०९४/२०२१
नि.नं.८
ने.ता.३०/०९/२०२१

१) श्रीमती.शारदाबेन हिरजी मनाणी
वय : ५७ वर्षे, धंदा : गृहिणी
२) श्री.नितीन हिरजी मनाणी
वय : ३७ वर्षे, धंदा : व्यवसाय
३) श्री.हितेश हिरजी मनाणी
वय : ३४ वर्षे, धंदा : व्यवसाय
सर्व रा.फ्लॅट नं.१०१, ओमकार बिल्डींग,
प्लॉट नं.१६, सेक्टर क्र.१२,
वाशी, नवी मुंबई-४००७०३ — अर्जदार

तमाम जनतेस या जाहीर नोटीशीद्वारे कळविण्यात येते की, कै.हिरजी नरसी मनाणी हे दि.०५/०९/२०२० रोजी परमार हॉस्पिटल अॅण्ड मॅटर्निटी होम पुणे येथे मयत झाले आहेत. त्यांचे खालील वर्णनाच्या मिळकतींबाबत वारस दाखला मिळणेकरिता अर्जदार यांनी अर्ज केलेला आहे.

**भूखंडाचे वर्णन**

| नोड | भूखंड क्र. | सेक्टर क्र. | क्षेत्र (चौ.मीटर) |
|---|---|---|---|
| खारघर | ११५ बी | १० | १४९.८९ |
| खारघर | ११६ | १० | १४९.७५ |

अर्जदार हे कै.हिरजी नरसी मनाणी यांचे कायदेशीर वारसदार आहेत. त्यांच्या हक्काबद्दल कोणाही व्यक्तीस हरकत घ्यावयाची असल्यास, त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून एका महिन्याच्या आत ह्या मे.कोर्टात प्रत्यक्ष हजर राहून अगर त्यांच्या वकीलांमार्फत त्यांच्या हरकती सादर कराव्यात. विहित मुदतीमध्ये हरकत सादर न केल्यास ना.कोर्ट योग्य त्या पुराव्यानिशी वरील अर्जदार व सामनेवाली यांस वारस दाखला प्रदान करतील. मुदतीनंतर येणाऱ्या हरकती ग्राह्य धरल्या जाणार नाहीत. आज दि.२४/०८/२०२१ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

**सही/-** **क.लिपीक** **दि.न्या.व.स्तर, पनवेल** — कोटाचा शिक्का — **सही/-** **सहा.अधिक्षक** **दि.न्या.व.स्तर, पनवेल**

पृष्ठ क्र.१ वरुन...

## मतांचा संघर्ष नाही तर भूमिपुत्रांच्या अस्मितेसाठी संघर्ष : आशिष शेलार

माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडला. त्यावेळी कार्यकर्त्यांना मार्गदर्शन करताना ते बोलत होते.

आमदार आशिष शेलार यांनी पुढे बोलताना, भूमिपुत्रांच्या हक्कासाठी दि. बा. पाटील यांनी आपले आयुष्य वेचले, अखेरच्या श्वासापर्यंत संघर्ष केला त्यांचे नाव नवी मुंबई विमानतळाला लागलेच पाहिजे असे सांगतानाच यासाठी उभारण्यात आलेल्या लढ्याचे त्यांनी कौतुक करत हा मतांचा संघर्ष नाही तर भूमिपुत्रांच्या अस्मितेसाठी संघर्ष असून दिबांचे नाव विमानतळाला लागलेच पाहिजे आणि त्यासाठी तसूभर मागे हटणार नाही, असा स्पष्ट ईशारा त्यांनी राज्य सरकारला दिला. सिडकोचे अध्यक्ष असताना आमदार प्रशांत ठाकूर यांनी येथील समस्या, नागरिकांचे प्रश्न, भूमिपुत्रांना न्याय देण्याचा प्रामाणिक प्रयत्न केला.

यावेळी लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी म्हंटले कि, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली देश प्रगती करीत असून या पक्षात सर्व कार्यकर्त्यांना मान सन्मान आणि काम करण्याची संधी मिळते. आज आम्ही ७० व्या वर्षीही राजकारण समाजसेवा करीत आहे त्यासाठी कार्यकर्त्यांची ताकद मिळत आहे आणि त्यातून आम्हाला कार्य करण्याची ऊर्जा मिळते. दिबासाहेबांच्या नावासाठी सर्वपक्षीय लढा उभारला. लढ्याला मोठे यश आले मात्र समिती रामशेठ ठाकूर यांनी हायजॅक केली असा आरोप शेकाप करतो समितीत बाळाराम पाटील यांना कार्याध्यक्ष पद होते मग त्यांनी का काम केले नाही असा सवालही त्यांनी उपस्थित केला. शेकापला पनवेल उरण मधून हद्दपार केले.

## राज्यात आज रुग्णसंख्येत वाढ; मृत्यूसंख्येनेही वाढली चिंता

मात्र, गुन्हा दाखल झाल्यापासून गजानन काळे हे फरार आहेत. नवी मुंबई पोलिसांची १० पथकं त्यांचा शोध घेत आहेत. गजानन काळेंवर गुन्हा दाखल असल्याने आता पोलिसांना देखील त्यांचा शोध घेण्याचं आव्हान आहे. काळेंचा फोन स्वीच ऑफ आहे. मात्र, गजानन काळे यांच्यावर पत्नीने गंभीर आरोप केल्यानंतर भाजपासह महाविकास आघाडीमधील महिला चांगल्याच आक्रमक पाहायला मिळाले होते. तक्रार दाखल करुन अनेक दिवस उलटून देखील अटक झालेली नसल्याने संताप व्यक्त केला जात होता. भाजपाच्या चित्रा वाघ यांनी आपण संजीवनी काळे यांच्या मागे उभ्या असल्याचं म्हटलं आहे.

## चिरनेर जंगल सत्याग्रहाचा अक्कादेवी रस्ता दुरुस्तीच्या प्रतिक्षेत

आदिवासी बांधवांना आपल्या उपजीविकेसाठी शेती व्यतिरिक्त भाजीपाला लागवड पावसाळ्यात उगवणाऱ्या रानभाज्या जमा करून शहरातील व गावातील बाजारात विक्रीसाठी घेऊन जावे लागत आहे. मात्र खराब रस्त्या अभावी कोणतेही वाहन वस्तीवर येत नाही डोक्यावर ओझे घेऊनच बाजार गाठावे लागते.

खेदाची गोष्ट म्हणजे एखादी आजारी व्यक्ती असल्यास त्याला दवाखान्यात दाखल करण्यासाठी तारेवरची कसरत करावी लागत आहे येथील आदिवासीना अन्य कोणतेही उत्पन्नाचे साधन नसल्याने ते मोलमजुरीची कामे करूनच आपली उदरनिर्वाह करत आहेत. मात्र लोकप्रतिनिधी व प्रशासनाचे या भागातील समस्यांकडे दुर्लक्ष केल्याने या भागातील लोकांचे जीवन मेटाकुटीला आले आहे. या रस्त्याचे जवळजवळ दहा बारा वर्ष दुरुस्ती झालीच नाही.असे येथील ग्रामस्थांचे म्हणणे असून,हा रस्ता चिरनेर जंगल सत्याग्रहाच्या ठिकाणी आक्कादेवीच्या माळरापर्यंत व्हावा या प्रतिक्षेत येथील आदिवासी बांधव आहेत.

## जाहीर नोटीस

ह्या जाहीर नोटीसीने सर्व लोकांस कळविण्यात येते की, मौजे-गुळसुंदे तालुका : पनवेल, जिल्हा : रायगड येथील परिशिष्ट 'अ', 'ब', 'क' मध्ये नमूद केलेली प्रकारातील जमीन मिळकत आमचे अशिल खरेदी करणार आहेत.

सबब, प्रस्तुत जमीन मिळकतीत कोणाचा कोणत्याही प्रकारचा हक्क, अधिकार, हितसंबंध, दावा, वाद असल्यास अशा सर्व संबंधितांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून आठ (०८) दिवसांचे आत प्रथमदर्शनी पुराव्यासह त्यांच्या हरकती रजिस्टर टपालाने पुढील पत्यावर नोंदवाव्यात. विहित मुदतीनंतर येणाऱ्या हरकतीस आमचे अशिल जबाबदार राहणार नाहीत ह्याची नोंद घ्यावी.

परिशिष्ट- 'अ'
शेतजमीन मिळकतीचे वर्णन
मौजे : गुळसुंदे, तालुका : पनवेल, जिल्हा : रायगड

| गट क्रमांक | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रु.पै. | मालक |
|---|---|---|---|
| १४१/२ | ०.२.७६ | २७.६० | रामचंद्र धोंडू पाटील |

परिशिष्ट- 'ब'
मिळकतीचे वर्णन
मौजे : गुळसुंदे, तालुका : पनवेल, जिल्हा : रायगड

| गावाचे नाव | मालमत्ता क्रमांक | मालकाचे नाव | मालमत्तेचे वर्णन | क्षेत्रफळ |
|---|---|---|---|---|
| गुळसुंदे | ४६४ | रामचंद्र धोंडू पाटील | विटांच्या भिंतीचे पत्र्याचे छप्पर | ३२×३२ चौ.फूट |

परिशिष्ट- 'क'
मिळकतीचे वर्णन
मौजे : गुळसुंदे, तालुका : पनवेल, जिल्हा : रायगड

| गावाचे नाव | मालमत्ता क्रमांक | मालकाचे नाव | मालमत्तेचे वर्णन | क्षेत्रफळ |
|---|---|---|---|---|
| गुळसुंदे | ३४१ (ब) | हर्षद रामचंद्र पाटील | विट, सिमेंट पत्र्याचे छप्पर | ४०×२० चौ.फूट |

ठिकाण : पनवेल
दिनांक : २५/०८/२०२१

**सही/-**
**श्री.विरेंद्र शामलाल गुप्ता**
**पत्ता : शॉप नं.१, रोनक झेरॉक्स सिल्व्हर सोसायटी, शिवाजी रोड पनवेल, ता.पनवेल, जि.रायगड**

मा.न्या.राव साहेब ह्यांचे न्यायालयात१
वारसांचे सर्टीफिकेटबद्दल जाहीरनामा — दिवाणी अ.१५० रा.
प्रोसेस जमा रु.५०/- — Civ. A 150 m
ॲड.शैलजा सलागरे
अर्जदार यांचे वकील

## जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायालय (व.स्तर) यांचे न्यायालयात
दि.चौ.अर्ज क्र.११०३/२०२१
नि.नं.८/ड
ने.ता.३०/०९/२०२१

श्री.उदय दत्तात्रय केळकर
वय : ६५ वर्षे, व्यवसाय : निवृत्त
सी-१, सी विंग, पहिला मजला,
शिव कॉम्प्लेक्स, पनवेल नगरपरिषद जवळ,
ता.पनवेल, जि.रायगड — अर्जदार
विरुद्ध
कोणीही नाही — सामनेवाला

वरील अर्जदार यांची आई कै.सुनंदा दत्तात्रय केळकर यांचे दि.११/०६/२००७ रोजी पनवेल येथे निधन झाले. मयत कै.सुनंदा दत्तात्रय केळकर यांच्या मालकीचे असलेले मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे :-

**मिळकतीचे वर्णन**
**सी-१, सी विंग, पहिला मजला,**
**शिव कॉम्प्लेक्स, पनवेल नगरपरिषद जवळ,**
**पनवेल, ता.पनवेल, जि.रायगड**

वरील मिळकतीबाबत अर्जदाराने वारस दाखला मिळणेबाबत अर्ज दिलेला आहे. तरी वरील वारसांचे दाखल्याबाबत ज्या कोणाचे हक्क, अधिकार, हितसंबंध अशी कोणत्याही प्रकारची तक्रार वगैरे असल्यास तशी लेखी हरकत ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत या न्यायालयात दाखल करावी.

वरील पद्धतीने कोणाचीही हरकत न आल्यास अर्जदारांच्या विनंतीप्रमाणे वारस दाखला देण्यात येईल. त्यानंतर आलेल्या हरकतींचा विचार केला जाणार नाही.

आज दि.२५/०८/२१ रोजी माझ्या सहीने व कोर्टाच्या शिक्क्याानिशी दिली.

**सही/-** **क.लिपीक** **दि.न्या.व.स्तर, पनवेल** — कोटाचा शिक्का — **सही/-** **सहा.अधिक्षक** **दि.न्या.व.स्तर, पनवेल**

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादकः **सुनील कृष्णाजी पोतदार** यांनी सिद्धकला प्रिंट मिडीया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा.लि., प्लॉट नं.डब्ल्यू-२३०, टी.टी.सी.इंडस्ट्रीयल एरिया, एमआयडीसी, ठाणे बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई-४००७१० येथे छापून १२, राधा हरी निवास कॉम्प्लेक्स, टिळक रोड, रामदास मंदिरासमोर पनवेल-४१०२०६, रायगड येथून प्रकाशित केले.
दूरध्वनी (०२२) २७४६९४३४, फॅक्स-२७४६७६१७ **संपादक : राकेश दिलीप पितळे** R.N.I.Reg.No.MAHMAR/2006/17212 या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (न्यायकक्षा-पनवेल) Email : raigad.nagari@gmail.com/ raigad.nagari@yahoo.com/ raigad.nagari@rediffmail.com

# संक्षिप्त...

## रायगड जिल्हा क्रिकेट असोसिएशनच्या माध्यमातून प्रथमच महिला क्रिकेट खेळाडूंची निवड

**दै.रायगड नगरी । पनवेल**

रायगड जिल्हा क्रिकेट असोसिएशनच्या वतीने आयोजित रायगड च्या इतिहासात प्रथमच मुलींची अंडर १९ मध्ये निवड करण्यात आली. सदर सिलेक्शन हे इनामपुरी खारघर येथे संपन्न झाले या सिलेक्शन साठी रायगड जिल्ह्यातून एकूण ३४ मुली आल्या होत्या आणि त्यातून चार मुलींची निवड करून आज महाराष्ट्र सिलेक्शन कॅम्प साठी पाठवण्यात आले आहेत. सर्व पालकांनी आणि खेळाडुनी क्रिकेट असोसिएशनचे याबद्दल आभार मानले. यावेळी मनीषा अडबळ आणि नीलम पाटील ह्या सिलेक्टर उपस्थित होत्या. मनीषा अडबळ यांच्या माध्यमातून आज सिलेक्शन करण्यात आले. यावेळी महाराष्ट्र रायगड जिल्हा क्रिकेट असोसिएशनचे अध्यक्ष चंद्रकांत मते, जिल्हा सरचिटणीस बहुतुले, स्पर्धा कमिटीचे चेअरमन किरीट पाटील सिलेक्शन कमिटीचे चेअरमन प्रीतम कैया, जिल्हा उपाध्यक्ष प्रकाश पावसकर,सुयोग चौधरी, संदीप पाटील, सुहास हिरवे, सागर सावंत, इत्यादी पदाधिकारी उपस्थित होते.

# प्रशासन आणि प्रसार माध्यमे यांच्यात सुसंवाद अत्यावश्यक : प्रसन्न जोशी

**दै.रायगड नगरी । नवीमुंबई**

प्रशासनात अनेक चांगले उपक्रम आणि इतरांना मार्गदर्शक कामे उभी राहतात. परंतु याबद्दलची माहिती प्रसार माध्यमांपर्यंत पोहचत नाही. त्यामुळे प्रशासनाबद्दल माध्यमांत गैरसमज होतो. प्रशासनातील कार्यसंस्कृती आणि प्रसार माध्यमे यामध्ये सुसंवाद असणे आवश्यक आहे. असे उद्गार साम टिव्हीचे संपादक प्रसन्न जोशी यांनी काढले.



कोकण विभागीय माहिती कार्यालय आणि महाराष्ट्र राज्य राजपत्रित अधिकारी महासंघ कोकण भवन शाखा यांच्या विद्यमाने आज संवाद कार्यक्रम आयोजित केला होता, त्यात ते बोलत होते. यावेळी दैनिक सकाळ मुंबईचे संपादक संदीप काळे यांनीही अधिकाऱ्यांशी संवाद साधला.

जोशी म्हणाले की, प्रशासनाने सोप्या पध्दतीने प्रसार माध्यमांना माहिती पुरविली तर माहितीच्या अधिकाराखाली मागविण्यात येणाऱ्या माहितीच्या अर्जांचे प्रमाण कमी होतील. प्रशासनाने पत्रकारांशी संवाद साधून त्यांना परिपूर्ण माहिती देणे आवश्यक आहे. त्याचप्रमाणे प्रसार माध्यमांनी सुध्दा प्रशासनाने केलेल्या कामाचे कौतूक करणेही गरजेचे आहे. माहिती व जनसंपर्क महासंचालनालयासारख्या शासकीय खात्यांनी प्रशासन व प्रसार माध्यमांचे परिसंवादाचे कार्यक्रम यापुढेही असेच घ्यावेत. असेही त्यांनी सुचविले.

समाजातील विविध प्रश्नांना वाचा फोडण्याचे काम प्रसार माध्यमे करीत असतात. माध्यमांनी मांडलेले सामाजिक प्रश्न सोडविण्याची भूमिका शासन नेहमीच बजावते.

प्रसार माध्यमे ही खऱ्या अर्थाने समाजमनाचा आरसा दाखविण्याचे काम करतात. या परिसंवादातून प्रशासन व प्रसार माध्यमे यामधील गैरसमज दूर होण्यास मदत होईल असेही ते म्हणाले.

संदीप काळे यांनी ते स्वत: दैनिक सकाळमध्ये लिहित असलेल्या सदराबद्दलचे त्यांना आलेले अनुभव मांडले. नियमित सदर लिहितांना येणाऱ्या अडीअडचणी व त्यातून होणारे समाजकार्य याबद्दलची माहिती दिली. पत्रकारिता करतांना माणूसकीही जपली पाहिजे असे त्यांनी सांगितले. पत्रकारांनी नेहमीच विकास पत्रकारिता केली पाहिजे. विकास पत्रकारिता करतांना प्रशासनाच्या माहितीसाठयाची मोठी मदत होते. समाजाच्या शेवटच्या घटकांपर्यंत पोहोचण्यासाठी पत्रकारांनी संकोच न बाळगता संवाद साधला, तर खरी माहिती मिळू शकते. यातून विधायक पत्रकारिता करता येऊ शकते. याची अनेक उदाहरणे त्यांनी यावेळी विषद केली.

यावेळी उपायुक्त (विकास) श्री.गिरीश भालेराव, राज्यकर उपायुक्त डॉ.विलास नागरगोजे, सहाय्यक आयुक्त मनिषा देवगुणे राज्यकर उपायुक्त रामोजी ठोंबरे, उपसंचालक (माहिती) डॉ.गणेश मुळे, वैद्यकीय अधिकारी डॉ.गणेश धुमाळ, तहसिलदार माधुरी डोंगरे, कमलेश नागरे, अस्मिता जोशी आदि अधिकारी कर्मचारी उपस्थित होते.

# बोर्लीपंचतन बाजारपेठेत ग्राहकांची रेलचेल

## पावसाच्या विश्रांतीने सणासुदीच्या खरेदीची लगबग; व्यापाऱ्यांना दिलासा

**दै.रायगड नगरी । दिघी**

कोरोनाने कोलमडलेल्या बाजारपेठेला आता मोठी उभारी मिळत आहे. कोरोना महामारीच्या पार्श्वभूमीवर मागील सहा महिन्यांपासून बाजारपेठेत पूर्ण मंदी होती. मात्र, मागील दोन दिवसांपासून पावसाच्या विश्रांतीने बोर्लीपंचतनमधील बाजारपेठेत खरेदीसाठी बाहेर पडलेल्या ग्राहकांनी व्यावसायिकांना दिलासा दिला आहे. कोरोनाच्या वाढत्या रुग्ण संख्येमुळे सुरक्षेच्या दृष्टीने रायगड जिल्ह्यात अधिक कालावधी रेड अलर्ट जारी केला गेला. परिणामी येथील व्यावसायिकांचे कंबरडे पुरते मोडले होते. त्यामध्ये पावसाने देखील नागरिकांना बाहेर पडून दिलं नाही. मात्र शांत असलेल्या बाजारपेठेला येणाऱ्या सणांमुळे नवी झळाळी मिळाली आहे. सद्या दहीहंडी, गणेशोत्सवासाठी येथील किराणा अगदी छोट्या छोट्या दुकानांपासून मोठ्या मोठ्या दुकानात व्यापाऱ्यांकडून मालाची जय्यत तयारी सुरू आहे. रविवारी २२ तारखेला रक्षाबंधन आणि नारळी पौर्णिमा झाली असल्याने दिवसभर बाजारपेठेत ग्राहकांची मोठी गर्दी होती. मागील दोन दिवसांपासून झालेल्या खरेदीने मोठया प्रमाणात आर्थिक उलाढाल झाली आहे.



### पर्यटनाला आला बहर

कोरोनाच्या प्रादुर्भावामुळे कोलमडलेला कोकण किनारपट्टीवरील पर्यटन व्यवसाय आता पुन्हा बहरू लागला आहे. पर्यटन व्यावसायिकांना चांगले दिवस येत आहेत. समुद्राच्या निळ्याशार लाटांची मौज आणि स्वच्छ सुंदर श्रीवर्धन तालुक्यानतील दिवेआगर किनारपट्टी पर्यटकांना भुरळ घालत असून तालुक्यासत पर्यटकांचा ओघ वाढत आहे. पर्यटन व्यवसाय पुन्हा बाळसे धरू लागल्यामुळे हॉटेल, रेस्टॉरंट, निवासी न्याहरी योजना, घरगुती खानावळी आदी पर्यटनावर आधारित विविध प्रकारच्या सेवा देणाऱ्या व्यवसायांचे जाळे येथे उभे राहिले आहे. तालुक्यातील किनारपट्टीवरील नागरिकांना घरच्याघरीच रोजगाराची संधी उपलब्ध झाली आहे. यामुळे ग्रामीण भागात पुढील कालावधीत अर्थव्यवस्थेला चालना मिळणार असल्याची माहिती येथील व्यवसायिकांनी दिली.

### व्यवसाय पूर्वपदावर

कोरोना काळात दोन वर्षांपासून निराशेचे वातावरण आहे. बाजारपेठा बंद असल्याने अनेकांवर उपासमारीची वेळ आली आहे. पण आता पुन्हा निर्बंध शिथिल झाल्यानंतर व्यवसाय पूर्वपदावर येत आहे.

# पनवेल तालुक्यात दोन दुचाकींना आग

**दै.रायगड नगरी । पनवेल**

दोन दुचाकी वाहनांना आगी लागल्याच्या घटना तालुक्यातील देवद येथे घडली असून यात दोन्ही वाहनांचे मोठे नुकसान झाले आहे.

येथील त्रिमूर्ती श्लोक इमारतीच्या पार्किंग मध्ये उभी असलेली टिव्हिएस मोटारसायकलला आग लागल्याचा प्रकार घडला असून सदर आगीची झळ त्या गाडीच्या बाजूला असलेल्या होंडा मोटारसायकलीससुद्धा बसली आहे. आग लागल्याचे समजताच सोसायटीच्या रहिवाशांनी धावत जाऊन आग विझवली आहे व याची माहिती खांदेश्वर पोलिसांना दिली आहे. सोसायटीत लावण्यात आलेल्या सिसिटिव्ही फुटेजच्या आधारे खांदेश्वर पोलिसांनी माहिती घेऊन संबंधित व्यक्तीविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.


राव साहेब कोर्ट

ॲड.धनश्री भोईर
अर्जदारांचे वकील

**जाहीर नोटीस**

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर यांचे न्यायालयात
दि.चौ.अर्ज क्र.१०४७/२०२१
नि.नं.८/ड
ने.ता.०६/१०/२०२१

कै.आत्माराम बाळाराम ठाकूर (मयत) तर्फे वारस
अ) श्रीमती.शशिकला आत्माराम ठाकूर (पत्नी)
वय : ५४ वर्षे, धंदा : गृहिणी
ब) श्री.रचित आत्माराम ठाकूर (मुलगा)
वय : ३२ वर्षे, धंदा : नोकरी
क) कु.प्रेरणा आत्माराम ठाकूर (मुलगी)
वय : २८ वर्षे, धंदा : नोकरी
वरील अर्जदार क्रं.१ ते ३ रा.कोळी गल्ली,
कानोबा मंदिरा जवळ, न्हावे, ता.पनवेल
ड) सौ.वीणा आत्माराम ठाकूर उर्फ (मुलगी)
कु.वीणा नरेंद्र ठाकूर
वय : २६ वर्षे, धंदा : गृहिणी
रा.विठ्ठल रुक्मिणी मंदिराजवळ,
भेंडखळ, ता.उरण, जि.रायगड — अर्जदार

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीद्वारे असे कळविण्यात येते की, कै.आत्माराम बाळाराम ठाकूर यांचे निधन दि.०४/१२/२०१९ रोजी न्हावे, ता.पनवेल येथे झाले असून कै.आत्माराम बाळाराम ठाकूर यांची आई कै.भिमाबाई बाळाराम ठाकूर यांचे निधन दि.०३/१२/१९८९ रोजी मौजे : न्हावे, ता.पनवेल, जि.रायगड राहत्या घरी मयत झालेले असून श्रीमती.शशिकला आत्माराम ठाकूर वगैरे ह्यांनी, कै.आत्माराम बाळाराम ठाकूर यांच्या स्वकष्टार्जित खालील वर्णनाची मिळकतीचे वारसपत्र मिळण्यासाठी अर्ज केलेला आहे.

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे : न्हावे, ता.पनवेल, जि.रायगड**

| युनिट केस नं. | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र (हे.आर.पॉ.) | आकार रु.पैसे |
|---|---|---|---|---|
| ४१५ | १/अ | ३०१ | ०३-१२-१२<br>०-०२-०० | ९.८१ |
| | | एकूण | ०३-१४-१२ | |
| | ५/अ | ३३२ | ००-२८-०१ | १.३७ |
| | | ३०१ | १-३५-०५ | ९.८१ |
| | १/अ | २१५ | ००-०२-०० | ०.३४ |
| | | २९ | ००-०६-०९ | १.२५ |
| | | २२० | ००-०२-०० | ०.२८ |

वरील मिळकती ही, कै.आत्माराम बाळाराम ठाकूर यांच्या स्वकष्टार्जित मालकीची आहे. श्रीमती.शशिकला आत्माराम ठाकूर वगैरे हे कै.आत्माराम बाळाराम ठाकूर यांचे कायदेशीर वारस आहेत. ह्या हक्काबद्दल कोणाही व्यक्तीस हरकती घ्यावयाच्या असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून एका महिन्याच्या आत ह्या मे.कोर्टात प्रत्यक्ष हजर राहून हरकती घ्यावयाच्या आहेत, जर या कालावधीमध्ये योग्य त्या हरकती घेतल्या नाहीत तर हे मे.कोर्ट श्रीमती.शशिकला आत्माराम ठाकूर वगैरे यांच्या हक्काबद्दल पुरावा घेण्याची ताबडतोब कार्यवाही करेल आणि ते जर कै.आत्माराम बाळाराम ठाकूर यांच्या वारस पत्रास हक्कवार आहेत असे सिद्ध झाल्यास त्यांना हे वारसपत्र मंजूर करेल.

आज दि.२५/०८/२०२१ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

सही/- क.लिपीक दि.न्या.व.स्तर, पनवेल — कोटाचा शिक्का — सही/- सहा.अधिक्षक दि.न्या.व.स्तर, पनवेल



मुजावर साहेब कोर्ट

अर्जदाराचे वकील श्री.विकास एस. पाटील

**जाहीर नोटीस**

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर यांचे कोर्टात
दि.चौ.अर्ज क्र.१०३३/२०२१
नि.नं.८/ड
ने.ता.०८/१०/२०२१

सौ.इंदुबाई राजाराम म्हात्रे
वय : ६२ वर्षे, धंदा : गृहिणी
रा.नितळस, पो.वावंजे, ता.पनवेल, जि.रायगड — अर्जदार

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, अर्जदार यांचे वडील कै.बाळा उर्फ बाळ्या हेंदऱ्या पाटील, रा.तोंडरे, ता.पनवेल, जि.रायगड हे दि.१०/०५/१९६६ रोजी मौजे : तोंडरे, ता.पनवेल, जि.रायगड येथे मयत झाले असून कै.बाळा उर्फ बाळ्या हेंदऱ्या पाटील यांची पत्नी कै.फसुबाई बाळा उर्फ बाळया पाटील ह्या दि.१२/०६/१९८५ रोजी मौजे : तोंडरे, ता.पनवेल, जि.रायगड येथे मयत झाल्या आहेत. तसेच कै.बाळा उर्फ बाळया हेंदऱ्या पाटील यांची आई कै.तुळसाबाई हेंदऱ्या पाटील ह्या दि.१२/०७/१९६२ रोजी मौजे : ढोंगऱ्याचापाडा, ता.पनवेल, जि.रायगड येथे मयत झाल्या आहेत. अर्जदार ह्या कै.बाळ्या हेंदऱ्या पाटील यांचे वारस असल्याबाबत खालील मिळकतीचे वारसपत्र मिळण्यासाठी अर्ज केलेला आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| गाव | स.नं. | हि.नं. | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रु.पै. |
|---|---|---|---|---|
| पालेखुर्द | १०९ | ३ | ०-४२-२ | ७.२५ |

वरील अर्जदार हे कै.बाळा उर्फ बाळ्या हेंदऱ्या पाटील यांचे कायदेशीर वारस आहेत ह्या हक्काबद्दल कोणाही व्यक्तीस हरकती घ्यावयाच्या असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून एक महिन्याच्या आत ह्या मे.कोर्टात प्रत्यक्ष हजर राहून हरकती घ्यावयाच्या आहेत जर या कालावधीमध्ये योग्य त्या हरकती घेतल्या नाहीत तर हे मे.कोर्ट अर्जदार यांच्या हक्काबद्दल पुरावा घेण्याची ताबडतोब कार्यवाही करेल आणि ते जर कै.बाळा उर्फ बाळ्या हेंदऱ्या पाटील यांच्या वारस पत्रास हक्कदार आहेत असे सिद्ध झाल्यास त्यांना हे वारसपत्र मंजूर करेल.

आज दि.२५/०८/२०२१ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

सही/- क.लिपीक दि.न्या.व.स्तर, पनवेल — कोटाचा शिक्का — सही/- सहा.अधिक्षक दि.न्या.व.स्तर, पनवेल



रावसाहेब कोर्ट

अर्जदारांचे वकील श्री.एकनाथ जी.खुटले

**जाहीर नोटीस**

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर यांचे कोर्टात
दि.चौ.अर्ज क्र.११२३/२०२१
नि.नं.८/ड
ने.ता.१३/१०/२०२१

सौ.वासंती विलास पायगुडे
वय : ५० वर्षे, धंदा : गृहिणी
रा.फ्लॅट नं.०४, दुसरा मजला, श्रेयस
को.ऑप.हौ.सोसायटी, प्लॉट नं.४४,
कोकण रेल्वे कॉटर्स जवळ, सेक्टर क्र.४०,
नेरुळ, नवी मुंबई ४००७०६ — अर्जदार

तमाम जनतेस या जाहीर नोटीशीद्वारे कळविण्यात येते की, कै. गंगाबाई शंकरराव देशमुख ह्या दि.१८/११/२०१३ रोजी मौजे : पनवेल, ता.पनवेल, जि.रायगड येथे मृत्यू पावल्या असून, त्यांचे खालील वर्णनाच्या मिळकतींबाबत वारस दाखला मिळणेकरिता अर्जदार यांनी, अर्ज केलेला आहे.

**जमिनींचे वर्णन**

| अनु. क्र. | युनिट केस नं. | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रु.पै. |
|---|---|---|---|---|---|
| १ | गव्हाण-५८१ | २७० | ७ ई | ०-४७-० | १.४६ |
| २ | गव्हाण-८२५ आणि ६८४ | अ/८८ | १६ | ०-१३-० | ०.३१ |
| ३ | | ३६१ | ५ | ०-२४-६ | - |
| ४ | गव्हाण-५८१+६२४+८२५ | ८८/अ | १७ अ | ०-१०-० | ०.०२ |
| ५ | गव्हाण-६८४ | ८८ | २९ अ | ०-२२-८ | ००.८९ |
| ६ | गव्हाण-८२५ | ३२ अ | १ | ०-०५-३ | - |
| ७ | | ३२ अ | ६+७ | ०-०५-८ | - |
| ८ | | ३२ अ | ५ | ०-०५-६ | - |
| ९ | | ८८ अ | १९ | ०-१३-५ | - |
| १० | | ८८ अ | १७ ब | ०-२३-० | - |
| ११ | | २६७ | ३ | ०-१०-० | ०.२२ |
| १२ | | २६७ | ४ | ०-२४-० | ०.६२ |
| १३ | | २६७ | ६ | ०-०६-० | ०.२२ |
| १४ | | २७० | १ | ०-४७-० | १.४४ |
| १५ | | २७० | ३ | ०-४७-० | ०.७८ |
| १६ | | २७० | ८ ब | ०-२२-० | ०.७२ |
| १७ | | २७१ | ४ अ | ०-०२-५० | ०.११ |
| १८ | | ८८ | ब | ०-०१-८० | १५.०० |
| १९ | | २७९ | १ | ०-१९-० | ३.१९ |
| २० | | २७१ | ५ ब | ०-१३-२० | १.०४ |
| २१ | | २७१ | ६ | ०-०४-८० | ०.१२ |
| २२ | | २७२ | ६ ब | ०-१४-० | १.४३ |

तसेच, मौजे : गव्हाण, ता.पनवेल येथील ग्रामपंचायत गव्हाण हद्दीतील, ग्रामपंचायतीचे ॲसेसमेंट लिस्टमध्ये नोंदी झालेल्या आहेत. मालमत्ता क्र.३४ (४०५ चौ.फूट मोजमापाचे कौलारु घर), मालमत्ता क्र.१८६ (५५८ चौ. फूट मोजमापाचे कौलारु भिंतीचे घर), मालमत्ता क्र.३१८ (७५० चौ.फूट मोजमापाचे कौलारु घर), मालमत्ता क्र.३२१ (९५७ चौ.फूट मोजमापाचे कौलारु घर) अशा वर्णनाच्या मिळकती आहेत.

अर्जदार हे कै.गंगाबाई शंकरराव देशमुख यांचे कायदेशीर वारसदार आहेत. त्यांचया हक्काबद्दल कोणाही व्यक्तीस हरकत घ्यावयाची असल्यास, त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून एका महिन्याच्या आत ह्या मे.कोर्टात प्रत्यक्ष हजर राहून अगर त्यांच्या वकीलांमार्फत त्यांच्या हरकती सादर कराव्यात. विहित मुदतीमध्ये हरकत सादर न केल्यास ना.कोर्ट योग्य त्या पुराव्यानिशी वरील अर्जदार यांस वारस दाखला प्रदान करतील. मुदतीनंतर येणाऱ्या हरकती ग्राह्य धरल्या जाणार नाहीत. आज दि.२४/०८/२०२१ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

सही/- क.लिपीक दि.न्या.व.स्तर, पनवेल — कोटाचा शिक्का — सही/- सहा.अधिक्षक दि.न्या.व.स्तर, पनवेल



Shri.Rao Saheb

Adv.Rajesh R. Chaudhari
(Applicants Advocate)

**Public Notice**

IN THE COURT OF CIVIL JUDGE JUNIOR DIVISION AT PANVEL
MISC. APPLICATION NO. 678 OF 2021
Exh. 8/D
Next Date : 14/10/2021

1.MR. THARAYIL NARAYANAN SIVAN
@ T. N. SIVAN
Aged about. 71 years,
Indian Inhabitant, — Applicants No.1
2) SMT. SHILPA SACHIN PANICKER
Age-33 years, Indian Inhabitant, — Applicants No.2
3) SMT. SEEMA ARUNKUMAR
Age-37 years, Indian Inhabitant.
All residing at: - 802, Pacific Heights,
Plot No. 17, Sector-11, Kalamboli.
Navi Mumbai 410218 — Applicants No.3
V/s — Opponent

**LATE Mrs. BHARATHI SIVAN @ BHARATHI THARAYIL SIVAN** was Wife and Daughter of applicant. That **LATE Mrs. BHARATHI SIVAN @ BHARATHI THARAYIL SIVAN** has died on **20/08/2019** at. **APOLLO HOSPITAL ENTERPRISE LTD., PLOT NO. 13, SEC. 23, CBD BELAPUR, NAVI MUMBAI.** The deceased **Mrs. BHARATHI SIVAN @ BHARATHI THARAYIL SIVAN** was the absolute owner and absolutely seized and possessed of immovable property i.e.

**1) FLAT NO. 801, 8 TH FLOOR, PACIFIC HEIGHTS, PLOT NO. 17, SECTOR-11, KALAMBOLI, NAVI MUMBAI, admeasuring about 58.481 Sq. Mtrs. Built up area, (629.255 Sq. Ft.) + 3.407 Sq. Mtrs. (36.659 Sq. Ft.) Terrace area. (Valuation of Rs. 4, 33,500/-) (Deceased having 50% share in above property)**

**2) GALA NO. H-649, BEAING SURVEY NO. 108 (1 PART) 2+3 VILLAGE VAVUENJE, TAL. PANVEL, DISTRICT RAIGAD (Valuation of Rs. 8,00,000/-**

**(Area 266.6) (Deceased having 100% share in above property)**

**3) FLAT NO. 802, 8th FLOOR, PACIFIC HEIGHTS, PLOT NO. 17, SECTOR-11, KALAMBOLI, NAVI MUMBAI, ademeasuring about. 46.422 Sq. Mtrs. Carpet , Terrace 3.633 Sq. Mtrs. (Valuation of Rs.19,00,000/-) (Deceased having 50% share in above property)**

The above applicant **Mrs. BHARATHI SIVAN @ BHARATHI THARAYIL SIVAN** has filed an Application for the Heirship Certificate before the Panvel court **(JUNIOR DIVISION AT PANVEL).**

Any person/ persons having any claim against or to the said property by way of sale, mortgage, charge, gift, lease, easement, use, trust, possession, inheritance, lien, or otherwise however, is hereby required to make the same known before the hon"ble court **(JUNIOR DIVISION AT PANVEL)**, within a period of 30 days from the date of publication hereof, otherwise the said will be completed without reference to such claims and the same, if any, will be considered as waived.

Dated : 20/08/2021

**Sd/- Jr.Clerk Civil Court, S.D.Panvel — Court Seal — Sd/- Asst.Suprierdendent. Civil Court, S.D.Panvel**



श्री.भाकरे साो.कोर्ट

ॲड.सुरज गोंधळी

**जाहीर नोटीस**

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर यांचे कोर्टात
दि.चौ.अर्ज क्र.११२०/२०२१
नि.नं.८/ड
ने.ता.१३/१०/२०२१

कै.रामा नागू म्हात्रे (मयत) वारस
१) श्रीमती.सिताबाई रामा म्हात्रे
वय : ६५ वर्षे, धंदा : शेती
२) श्री.महेश रामा म्हात्रे
वय : ४० वर्षे, धंदा : शेती
३) कै.गजानन रामा म्हात्रे (मयत) वारस
३/१) श्रीमती.अनिता गजानन म्हात्रे
वय : ४१ वर्षे, धंदा : शेती
३/२) कु.सोनाली गजानन म्हात्रे
वय : २० वर्षे, धंदा : शिक्षण
३/३) कु.प्रथम गजानन म्हात्रे
वय : १९ वर्षे, धंदा : शिक्षण
३/४) सौ.प्रणाली राजेश पाटील
वय : २३ वर्षे, धंदा : शेती
क्र.१ ते ३/४ रा.वेश्वी, ता.उरण, जि.रायगड
४) कै.दर्शना विश्वनाथ म्हात्रे (मयत) वारस
४/१) कै.दर्शना विश्वनाथ म्हात्रे
वय : १४ वर्षे, धंदा : शिक्षण
४/२) कु.विश्वास विश्वनाथ म्हात्रे
वय : १२ वर्षे, धंदा : शिक्षण
४/३) कु.करण विश्वनाथ म्हात्रे
वय : १० वर्षे, धंदा : शिक्षण
४/४) कु.करुणा विश्वनाथ महत्रे
वय : १० वर्षे, धंदा : शिक्षण
४/५) कु.लखन विश्वनाथ म्हात्रे
वय : ०७ वर्षे, धंदा : शिक्षण
४/६) कु.साक्षी विश्वनाथ म्हात्रे
वय : ०५ वर्षे, धंदा : शिक्षण
अर्जदार क्र.४/१ ते ४/६ अज्ञान तर्फे,
अज्ञान पालनकर्ता वडील
श्री.विश्वनाथ रामजी म्हात्रे
वय : ५३ वर्षे, धंदा : शेती
क्र.४/१ ते ४/६ रा.ओवे, ता.पनवेल, जि.रायगड — अर्जदार

तमाम जनतेस या जाहीर नोटीशीद्वारे कळविण्यात येते की, ना.कोर्टाच्या स्थळसिमेंत व अधिकार क्षेत्रात मौजे : आदई, ता.पनवेल, जि.रायगड येथील खालील वर्णनाच्या मिळकती, कै.रामा नागू म्हात्रे व अन्य सहहिस्सेदार यांचे मालकीच्या, ताबेकब्जातील, वहिवाटीतील व कसवणुकीतील होत्या व आहेत.

**शेतजमिनींचे वर्णन**

| स.नं. | हि.नं. | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रु.पै. |
|---|---|---|---|
| ६३ | २४ | ०-६१-०० | १.६३ |
| ६२ | ६ | ०-०७-८० | ०.५० |
| ६३ | २५ | ०-०५-०० | ०.०९ |

कै.रामा नागू म्हात्रे हे दि.०७/०१/२०२१ रोजी मयत झाले असून, त्यांना अर्जदार क्र.१ ही विधवा पत्नी, अर्जदार क्र.२ व कै.गजानन रामा म्हात्रे हे मुलगे, आणि कै.दर्शना विश्वनाथ म्हात्रे ही विवाहित मुलगी असे कायदेशीर वारसदार होते व आहेत.

वरीलपैकी कै.गजानन रामा म्हात्रे हे दि.०३/०५/२०१८ रोजी डॉ.डी. वाय.पाटील हॉस्पिटल, नेरुळ-नवी मुंबई येथे मयत झाले असून, त्यांना अर्जदार क्र.३/१ ही विधवा पत्नी, अर्जदार क्र.३/२ व ३/४ या मुली व अर्जदार क्र.३/३ हा मुलगा, असे कायदेशीर वारसदार आहेत.

तसेच, वरीलपैकी कै.दर्शना विश्वनाथ म्हात्रे ह्या दि.२३/१२/२०१५ रोजी राहत्या घरी मयत झाल्या असून, त्यांना अर्जदार क्र.४/१ ते ४/३ व ४/५ हे मुलगे, आणि अर्जदार क्र.४/४ व ४/६ ह्या मुली, असे कायदेशीर वारसदार आहेत. सबब, कै.रामा नागू म्हात्रे यांना अर्जदार हेच कायदेशीर वारसदार होते व आहेत. त्याचप्रमाणे कै.रामा नागू म्हात्रे यांचे मृत्यूपूर्वीच त्यांच्या आाई कै.राईबाई नागू म्हात्रे या देखील दि.०७/१२/२०१५ रोजी मु.चिखले, ता.पनवेल येथे मयत पावल्या आहेत.

सबब कै.रामा नागू म्हात्रे यांना केवळ अर्जदार क्र.१ ते ४/६ हेच कायदेशीर वारसदार आहेत. त्यांच्या हक्काबद्दल कोणाही व्यक्तीस हरकत घ्यावयाची असल्यास, त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून एका महिन्याच्या आत ह्या मे.कोर्टात प्रत्यक्ष हजर राहून अगर त्यांच्या वकीलांमार्फत त्यांच्या हरकती सादर कराव्यात. विहित मुदतीमध्ये हरकत सादर न केल्यास ना.कोर्ट योग्य त्या पुराव्यानिशी वरील अर्जदार यांस वारस दाखला प्रदान करतील. मुदतीनंतर येणाऱ्या हरकती ग्राह्य धरल्या जाणार नाहीत.

आज दि.२५/०८/२०२१ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

सही/- क.लिपीक दि.न्याया, पनवेल — कोटाचा शिक्का — सही/- सहा.अधिक्षक दि.न्याया, पनवेल

# संक्षिप्त...

## डॉ. ए.पी.जे.अब्दुल कलाम राष्ट्रीय ऑनलाईन प्रश्नमंजुषा स्पर्धेत रोह्याच्या आर्यन आंब्राळेचे यश

**दै.रायगड नगरी । रोहा**

भारतरत्न डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम यांच्या सहाव्या स्मृतिदिनानिमित्त डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम इंटरनॅशनल फाऊंडेशन रामेश्वरम या संस्थेने दिनांक २७ जुलै २०२१ रोजी राष्ट्रीय स्तरावर ऑनलाईन प्रश्नमंजुषा स्पर्धेचे आयोजन केले होते.



विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन व राष्ट्रीय एकात्मता वृद्धींगत व्हावी हा या स्पर्धेचा मुख्य उद्देश होता. देशभरातील हजारो विद्यार्थी या स्पर्धेत सहभागी झाले होते. या स्पर्धेचा निकाल नुकताच जाहीर करण्यात आला. या राष्ट्रीय स्तरावरील ऑनलाईन प्रश्नमंजुषा स्पर्धेत रोहा येथील को.ए.सो. वीणा पंडीत तेंडुलकर इंग्रजी माध्यम शाळेचा इयत्ता दहावीतील विद्यार्थी कु. आर्यन संजय आंब्राळे याने द्वितीय क्रमांक मिळविला आहे.

या विशेष कामगिरीबद्दल कु. आर्यन याचा डॉ. ए.पी.जे.अब्दुल कलाम इंटरनॅशनल फाऊंडेशन तर्फे सन्मानचिन्ह , प्रमाणपत्र व ७५०० रु.( साडे सात हजार रु.) रोख देऊन सन्मान केला आहे. या स्पर्धेसाठी कु. आर्यन याला शाळेच्या मुख्याध्यापिका स्वाती जोशी तसेच विज्ञान शिक्षिका संगिता गायकवाड यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले.

कु. आर्यन आंबाळेने मिळवलेल्या या दैदीप्यमान यशाबद्दल कोकण एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष संजयभाई पाटील, को.ए.सो.चे संचालक ॲड. हेमंत गांगल , शाळेच्या स्थानिक व्यवस्थापन समितीच्या अध्यक्ष गौरी गांगल तसेच शाळा व्यवस्थापन समितीचे सर्व पदाधिकारी व सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी अभिनंदन केले आहे.


### वाचकांना विनम्र सूचना

**दै.रायगड नगरी वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींतील मजकूराची शहानिशा करूनच वाचकांनी त्यासंबंधी आर्थिक व्यवहार करावा. जाहिरातीत आपल्या उत्पादनाच्या संदर्भात वा सेवेच्या संदर्भात जाहिरातदार जे दावे करतात त्याची दै.रायगड नगरी कोणतीही हमी घेत नाही. जाहिरातीत करण्यात आलेल्या दाव्यांची पुर्तता जाहिरातदारांकडून न झाल्यास त्याच्या परिणामाबद्दल दै.रायगड नगरी वृत्तपत्राचे मुद्रक, प्रकाशक, संपादक व मालक हे जबाबदार राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.**


### सेनेच्या उपोषणाच्या इशाऱ्यानंतर राजिपच्या आरोग्य विभागाला जाग

# नवघर आरोग्य उपकेंद्राच्या उभारणीसाठी ६१.६७ लाख निधी मंजूर

**दै.रायगड नगरी । जेएनपीटी**

सेनेच्या इशाऱ्यानंतर रायगड जिल्हा परिषदेचा आरोग्य विभागाला अखेर खडबडून जाग आली आहे.२० वर्षांपासून अडगळीत पडलेल्या नवघर आरोग्य उपकेंद्राची नव्याने इमारत उभारण्यासाठी ६१.६७ लाख रुपयांच्या खर्चाला तत्काळ प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे.

उरणच्या ग्रामीण भागातील नागरिकांसाठी उभारण्यात आलेले नवघर आरोग्य उपकेंद्र मागील २० वर्षीपासून बंदच आहे. बंद पडलेल्या दयनीय अवस्थेतील आरोग्य उपकेंद्रामुळे गरीब-गरजू रुग्णांना उपचारासाठी इतरत्र पायपीट करावी लागत आहे. नवीन उपकेंद्र सुरू करण्याच्या मागणीसाठी मागील तीन वर्षांपासून सातत्याने पाठपुरावा करूनही उपकेंद्राची दूरुस्तीकडे दुर्लक्षच केले जात होते. तसेच



याप्रकरणी विविध वर्तमान पत्रात राजिपच्या गलथान कारभाराविरोधात टिकेची झोड उठवली होती. तसेच संतप्त झालेल्या सेनेचे राजिप सदस्य विजय भोईर यांनी कामचुकार शासकीय अधिकाऱ्यांविरोधात उपोषणाला बसण्याचा इशाराही रायगडच्या पालकमंत्री आदित्य तटकरे यांना दिलेल्या निवेदनातून दिला होता.

सेनेच्या या इशाऱ्यानंतर राजिपच्या आरोग्य विभागाला अखेर जाग आली आहे.जिल्हा आरोग्य अधिकारी सुधाकर मोरे यांनी नवघर आरोग्य उपकेंद्राची दुमजली इमारत उभारण्यासाठी तातडीने बैठक घेऊन ६१.६७ लाख रुपयांच्या खर्चाला तत्काळ प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे. नव्याने उभारण्यात येणाऱ्या नवघर आरोग्य उपकेंद्रात रुग्णांसाठी विविध आरोग्य सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार असल्याची माहिती सेनेचे राजिप सदस्य विजय भोईर यांनी दिली.

## युसूफ मेहेरअली सेंटर येथे मानसिक आरोग्य विषयक कार्यशाळा



**दै.रायगड नगरी । कळंबोली**

युसुफ मेहेरअली सेंटर बांधवाडी आणि पोद्दार फाउंडेशन मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने बांधवाडी येथे मानसिक आरोग्य विषयक कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते.

सुरवातीला संस्थेचे प्रकल्प संचालक सुरेश रासम यांनी कार्यशाळेचे उद्देश व प्रस्तावना मांडतानाच युसूफ मेहेरअली सेंटर येथे समुपदेशन केंद्र सुरू करण्याचा मानस असल्याचे सांगितले तर कार्यशाळेचे मार्गदर्शक पोद्दार फाउंडेशन मुंबईचे समन्वयक मिलिंद क्षिरसागर यांनी मानसिक आजारांची कारणे या विषयावर मार्गदर्शन केले बदलत्या जीवनशैलीत दैनंदिन दिनचर्येमध्ये कौटुंबिक नाते संबंधांतील समस्या, चिंता, व्यसन यासह कामाच्या ठिकाणी असलेले दडपण, यातून मानसिक आरोग्याचे प्रश्न निर्माण होतात. त्यामुळे आपण ज्या पद्धतीने शारिरीक आरोग्याकडे लक्ष देतो. तसेच मानसीक संतुलन राखण्यासाठी रोज थोडा वेळ मनासाठीही दिला पाहिजे रोज थोडा वेळ आपण आपल्या मानाशीही बोलले पाहीजे मानसिक आजारांवरही मानसोपचार तज्ञानकडून समुपदेशनाच्या माध्यमातून उपचार करू शकत असल्याचेही मिलिंद क्षिरसागर यांनी सांगितले कार्यशाळेची प्रस्तावना यांनी मांडली. डॉ. सुखदेव कांबळे, बाळकृष्ण सावंत सामाजिक कार्यकर्ते संतोष ठाकूर, अंजना पवार, देविदास पाटील, युसुफ मेहेरअली विद्यालयाचे मुख्याध्यापक रत्नाकर भोईर, वसतिगृह अधिक्षिका उत्पला म्हात्रे, संजय वेलादी, दत्ता झिंगणे यांच्यासह संस्थेचे कामगार, आरोग्य कर्मचारी, विद्यार्थी आदी उपस्थित होते.

## उरण वाहतूक वरिष्ठ निरीक्षकपदी जगदीश कुलकर्णी तर न्हावाशेवा शाखेत निरज चौधरी यांची नियुक्ती

**दै.रायगड नगरी । उरण**

उरण तालुक्यातील वाहतूक पोलिस अधिकाऱ्यांच्या नवीमुंबई पोलिस आयुक्तालयाच्या वतीने बदल्या करण्यात आल्या असून, उरण वा-हतूक शाखेच्या वरिष्ठ पोलिस निरीक्षक पदी जगदीश कुलकर्णी यांनी नियुक्ती करण्यात आली असून, न्हावाशेवा बंदर वाहतूक शाखेच्या वरिष्ठ निरीक्षक पदी निरज चौधरी यांनी नियुक्ती करण्यात आली आहे.

जगदीश कुलकर्णी यांनी मुंबई क्राईम ब्रँच व २०१९ - २० या वर्षात उरण पोलिस ठाणे येथे सक्षमतेने काम केले असून, कोरोना काळातही कोरोनापासून नागरिकांच्या बचावासाठी नियोजनबद्ध काम केले आहे. ७ महिन्यांपूर्वी त्यांची बदली नवीमुंबई आयुक्तालय सुरक्षा शाखा येथे झाली होती. मात्र जनतेसाठी जिव्हाळ्याने कार्यरत असणारे यांची पुन्हा एकदा उरण वाहतूक विभागाच्या वरिष्ठ पोलिस निरीक्षक पदी नियुक्ती करण्यात आली आहे. त्यांच्या जागी असलेले वरिष्ठ पोलिस निरीक्षक माणिक नलावडे यांना नवीमुंबई सुरक्षा शाखा येथे बदली करण्यात आली आहे.



तर न्हावाशेवा बंदर वाहतूक विभागातील वरिष्ठ पोलिस निरीक्षक पदी वर्णी लागलेल्या निरज चौधरी यांनी उपराजधानी नागपूर येथे व ठाणे येथे वाहतूक विभागात या अगोदर काम केल्याचा त्यांचा डांनगा अनुभव आहे. त्यांच्या ठिकाणी काम करीत असलेले वरिष्ठ पोलिस निरीक्षक भारत कामत यांची बदली नवी मुंबई बॉम्ब शोधक पथकामध्ये करण्यात आली आहे.

दोन्ही वाहतूक विभागातील अधिकाऱ्यांसमोर वाहतूक कोंडी समस्येचे मोठे आव्हान आहे. उरण वाहतूक शाखेकडे गोदामे आणि उरण शहर तर न्हावाशेवा वाहतूक विभागाकडे जागतिक ख्यातीच्या जेएनपीटी, जीटीआय, एनएसआयसीटी व भारत कंटेनर टर्मिनल चौथे बंदर अशा चार बंदरांसह विविध टँकिंग कंपन्यांच्या अवजड वाहतूक सुरळीत राखण्याची जबादारी आहे.

## भात व नाचणी पीक स्पर्धेमध्ये सहभाग घ्यावा : सागर वाडकर

**दै.रायगड नगरी । तळा**

तळा तालुका डोंगराळ भागात वसलेला असुन या तालुक्यामध्ये खरीप हंगामामध्ये प्रामुख्याने भात व नाचणी ही मुख्य पिके घेतली जातात. तालुक्यातील शेतकऱ्यांची उत्पादकता वाढावी म्हणून कृषी विभागामार्फत विविध प्रयत्न केले जातात.

त्याच बरोबर शेतकरीसुद्धा विविध प्रयोग करतात वउत्पादकता वाढविण्यासाठी प्रयत्न करतात. अशा प्रयोगशील शेतकऱ्यांना प्रोत्साहन देऊन गौरव केल्यास त्यांची इच्छा शक्ती, मनोबल यामध्ये वाढ होऊन आणखीन उमेदीने नवनवीन अद्यावत तंत्रज्ञानाचा वापर केला जाईल. तसेच त्यांचे मार्गदर्शन व आदर्श गावातील इतर शेतकरी घेतील त्यामुळे राज्याच्या एकूण उत्पादनात मोलाची भर पडेल हा उद्देश ठेवून भात व नाचणी पिकासाठी राज्याअंतर्गत पीक स्पर्धा कृषी विभागामार्फत राबविण्यात येत आहे.

स्पर्धेसाठी तालुका हा आधारभूत घटक असून तालुक्यातील सर्वसाधारण गटातील किमान १० व आदिवासी गटातील किमान ५ शेतकऱ्यांनी स्पर्धेमध्ये सहभाग घेणे गरजेचे आहे. तसेच सहभागीशेतकऱ्यांनी किमान १० गुंठे क्षेत्रावर सलग पिकाचे क्षेत्र असणे आवश्यक आहे. स्पर्धेमध्ये सहभागी होण्यासाठी प्रवेश शुल्क ३०० रुपये निश्चित करण्यातआले आहे.पिकाची कापणी गाव पातळीवरील समिती समक्ष होईल. येणाऱ्या उत्पादनाची नोंद ऑनलाइन पद्धतीने केली जाईल. विजेतेपदासाठी पात्र होण्यासाठी तालुक्याच्या सरासरी उत्पादकता पेक्षा १.५ पट व त्यापेक्षा अधिक उत्पादकता येणे आवश्यक आहे. विजेत्यांना रोख रक्कम व प्रमाणपत्राचे वितरण कृषी विभागामार्फत करण्यात येईल. पीक स्पर्धेमध्ये अर्ज करण्याची अंतिम मुदत ३१ ऑगस्ट आहे. विजेत्या प्रथम, द्वितीय, तृतीय क्रमांक पटकावणाऱ्या शेतकऱ्यांना तालुका पातळीवर अनुक्रमे ५,३,२ हजार रुपये तर जिल्हा पा-तळीवर अनुक्रमे १०, ७,५ हजार रुपये तसेच विभागपातळीवर २५, २०, १५ हजार रुपये व राज्य पातळीवर अनुक्रमे ५०, ४०, ३० हजार रुपये प्रोत्साहनपर बक्षीस देण्यात येणार आहे. शेतकऱ्यांची प्रतिष्ठा व उत्पादन वाढीसाठी हा एक चांगला उपक्रम असून तालुक्यातील जास्तीत जास्त शेतकऱ्यांनी या स्पर्धेमध्ये सहभागी व्हावे व स्पर्धेच्या अधिक माहितीसाठी नियम व अटी जाणून घेण्यासाठी कृषी सहाय्यक, कृषी पर्यवेक्षक यांच्याशी संपर्क साधण्याचे आवाहन सागर वाडकर तालुका कृषी अधिकारी यांनी केली आहे.

## विक्रांत पाटील यांच्या पाठपुराव्याने प्रभागातील पावसामुळे पडलेले खड्डे बुजवण्याच्या कामाला सुरुवात



**दै.रायगड नगरी । पनवेल**

यावर्षी झालेल्या अतिवृष्टीमुळे प्रभागातील बऱ्याच ठिकाणी रस्त्यावरील ड्रेनेज झाकणांच्या बाजूला असलेल्या सिमेंट मटेरियल वाहून गेल्यामुळे खड्डे पडले होते, तसेच काही ठिकाणी रस्ता ही खराब झाला होता.

खड्ड्यांमुळे रहदारीला पण अडथळा होत होता. पावसाने उसंत घेतल्यामुळे हे सर्व खड्डे बुजवण्याच्या कामाला नगर-सेवक विक्रांत पाटील यांच्या पाठपुराव्याने सुरुवात झाली.

पहिल्या टप्प्यात प्रभागातील रिलायन्स फ्रेश चौक, ठाणा नाका रोड, चिंतामणी हॉल समोरील रस्ता, सहस्त्रबुद्धे हिस्पिटल चौक, वाल्मिकी नगर, परदेशी आळी ते सावरकर चौक, या ठिकाणी असलेले खड्डे बुजवण्यात आले. नगरसेवक विक्रांत पाटील तत्परतेने प्रभागातील समस्या सोडवतात त्याबद्दल नागरिकांनी समाधान व्यक्त केले.

## संत निरंकारी मिशन द्वारे वननेस-वन परियोजनेचा शुभारंभ

### म्हसळा, पेण व अलिबाग येथे उभारणार नागरी वृक्ष समूह

**दै.रायगड नगरी । दिघी**

सद्गुरु माता सुदीक्षाजी महाराज यांच्या शुभहस्ते २१ ऑगस्ट, २०२१ रोजी 'Oneness-Vann' (वननेस-वन) नामक या परियोजनेचा शुभारंभ करण्यात आला. भारताच्या ७५व्या स्वातंत्र्य दिनाच्या निमित्ताने संत निरंकारी मिशनद्वारे 'अर्बन ट्री क्लस्टर' (नागरी वृक्ष समूह) अभियान सुरू करण्यात आला. या अभियानात जिल्ह्यातील पेण, अलिबाग व म्हसळा येथे रोप लागवड करण्यात आली.



या अभियानाचा प्रारंभ करताना सद्गुरु माता सुदीक्षाजी महाराज म्हणाल्या, प्राणवायु, जो आम्हाला या वृक्षांपासून प्राप्त होत असतो त्याचे धरतीवर संतुलन ठेवण्यासाठी वनांची निर्मिती करणे आवश्यक आहे. जेवढे अधिक वृक्ष लावू तेवढीच अधिक ऑक्सिजनची निर्मिती होईल आणि तेवढीच शुद्ध हवाही प्राप्त होईल. ज्याप्रमाणे वननेस-वन चे स्वरूप अनेकतेत एकतेचे दृश्य प्रस्तुत करते तद्वत मानवानेही समस्त विसरुन शांतीपूर्ण सह-अस्तित्वाच्या भावनेने एकोप्याने राहून जगाचे सौंदर्य वाढवण्याची गरज आहे.

माता सुदीक्षाजी यांनी World Senior Citizen's Day चा उल्लेख करुन सांगितले की 'वृक्षांची छाया, वृद्धांची माया' या उक्तीप्रमाणे जसे ज्येष्ठांचे आशीर्वाद आमच्यासाठी आवश्यक आहेत तद्वत वृक्षदेखील आमच्या जीवनासाठी अत्यंत महत्वपूर्ण आहेत. वननेस-वन नामक या परियोजने अंतर्गत संपूर्ण भारतातील वेगवेगळ्या ठिकाणी वृक्षांचे समूह लावण्यात येतील. त्यांच्या वाढत्या संख्येच्या प्रभावाने आजुबाजूचे वातावरण प्रदूषित होण्यापासून वाचू शकेल आणि स्थानिक तापमान सुद्धा नियंत्रणात राहील. हे वृक्ष स्थानिक जलीवायु आणि भौगोलिक परिस्थितीनुसारच लावण्यात येणार आहेत. संत निरंकारी मिशनचे सेवादार वृक्षांची लागवड केल्यानंतर सतत तीन वर्षे त्यांची देखभाल करतील. त्यामध्ये वृक्षांचे रक्षण, खत व पाण्याची उचित व्यवस्था इत्यादिंचा समावेश आहे.

आज जेव्हा आमची धरती ग्लोबल वॉर्मिंगच्या समस्येचा सामना करत आहे, अशा समयी वृक्षारोपणाचे महत्व आणखी अधिक वाढलेले आहे. सन २०२० पासून कोरोना संकटाने आपल्या सर्वांनाच प्रकृतीची अनमोल देणगी असलेल्या प्राणवायुचे म्हणजेच ऑक्सिजनचे महत्व काय आहे ते चांगले शिकवले आहे. शिवाय त्याच्या उणीवेमुळे उत्पन्न होणाऱ्या दुष्परिणामांशीही आम्हाला अवगत केले आहे. आपल्याला हे ध्यानात ठेवायला हवे, की मानवी शरीरामध्ये जीवंतपणा असल्याचे प्रतीक हा प्राणवायुच आहे जो आपल्याला या वनश्रीपासून प्राप्त होतो.

या परियोजने अंतर्गत रायगड जिल्ह्यातील म्हसळा, पेण व अलिबाग याठिकाणी येथे २०० इतकी झाडे लावण्यात आली आहेत. म्हसळा येथील रोप लागवडी प्रसंगी म्हसळा नगरपंचायतचे मुख्य कार्यकारी अधिकारी मनोज उकिर्डे, वडवली ब्रँचचे मुखी गणेश नात्ती, हिरामण चव्हाण उपस्थित होते. त्यांनी वननेस-वन अभियानाची स्तुती करत असतानाच मिशनच्या विविध सामाजिक उपक्रमांचे व मानवतावादी आध्यात्मिक कार्याचे कौतुक केले. वृक्षारोपण करण्यासाठी मिशनचे रायगड ४० अ चे क्षेत्रीय प्रबंधक प्रकाश म्हात्रे, सेवादलाचे क्षेत्रीय संचालक प्रविण पाटील तसेच स्थानिक प्रबंधक यांच्या मार्गदर्शनाखाली सेवादलचे स्थानिक अधिकारी व स्वयंसेवक यांनी अथक परिश्रम करुन वृक्षारोपणाचे कार्य पार पाडले.

### सार्वजनिक बांधकाम खात्याचे दुर्लक्ष

## रस्त्यावरील झुकलेल्या फांद्या अपघाताला आमंत्रण



**दै.रायगड नगरी । कोर्लई**

साळाव-मुरुड रस्त्यावर दांडा आदिवासवाडी ते वाघोबा मंदिर दरम्यान गेल्या दोन महिन्यांपासून रस्त्यावरील झुकलेल्या झाडांच्या फांद्या वाहतुकीला अडथळा ठरत असून याकडे संबंधित सार्वजनिक बांधकाम खात्याचे दुर्लक्ष दिसून येते आहे.

या रस्त्यावर अनेक ठिकाणी झुकलेल्या झाडांच्या फांद्या वाहतुकीला अडथळा ठरत आहेत. यामुळे वेळप्रसंगी एस.टी.सेवा अथवा अवजड वाहनांना फांद्या लागून किंवा या फांद्या चुकविताना वाहनांना अपघाताची शक्यता नाकारता येत नाही.

सार्वजनिक बांधकाम खात्याच्या अधिकाऱ्यांनी यात लक्ष पुरवून या रस्त्यावरील झाडांच्या झुकलेल्या फांद्या तोडण्यात येऊन वाहतुकीतील अडथळा दूर करण्यात यावा. अशी मागणी वाहनचालक व प्रवासीवर्गातून होत आहे.